# माणूस

शनिवार । २२ नोव्हेंबर १९८० । एक रुपया


## सप्रेम नमस्कार

¤ या वर्षीच्या दिवाळी अंकांच्या वाचनाची सुरुवात 'माणूस' पासून झाली हा मला शुभशकुन वाटतो. सर्वांगपरिपूर्ण आणि विशिष्ट दर्जाचा, तसेच आपली परंपरा जतन करणारे साहित्य दिल्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन.

'योद्धा शेतकरी' हा श्री. विजय परुळकर यांनी करून दिलेला श्री. शरद जोशी यांचा परिचय खरोखरच 'इंडियावासियां'च्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा आहे. पांडू खाडे यांची मुलाखत एका अपरिचित अशा अद्भूतरम्य वातावरणात नेऊन सोडते आणि 'अन्वर सलीम' ही सौ. प्रतिभा रानडे यांची कादंबरी एका देशकालातीत दुःखाला वाचा फोडते.

दिवाळी अंक हे केवळ मनोरंजनाचे साधन न मानता वाचकांना विशिष्ट विचारसरणींची ओळख करून देण्याचे साधन आहे याचे भान आपण ठेवलेत याबद्दल आनंद वाटतो. 'माणूस'ची मी नियमित वाचक आहे आणि उत्कृष्ट साप्ताहिकाची गरज 'माणूस' भरून काढतो हे आपुलकीने सांगू इच्छिते.

६ नोव्हेंबर ८० . नीलिमा देशपांडे, मुंबई

¤ 'माणूस' दीपावली १९८० चा अंक उत्कृष्ट लेखांनी बहरलेला आहे. लेख मनोवेधक, प्रवाही व स्फूर्तिप्रद वाटतात. साहित्यशैली विलोभनीय व मनाची पकड घेणारी आहे. प्रत्येक लेख दर्जेदार लिखाणाचा आदर्श आहे.

या लेखांपैकी एक बेमिसाल पांडू खाडे यांची मुलाखत नितांत हृदयस्पर्शी आहे. तसेच सौ. प्रतिभा रानडे यांचा 'अन्वर सलीम' ही उल्लेखनीय !

११ नोव्हेंबर ८० ना. श्री. सोनटक्के, पुणे

¤ 'माणूस' दीपावली अंक वाचून अत्यंत आनंद व समाधान वाटले. आपला अंक समाजाचे अज्ञान घालविण्याचे आणि त्यात जागृती निर्माण करण्याचे अवघड कार्य पूर्ण करेल यात शंकाच वाटत नाही. अंकात कोठेही स्त्री–सौंदर्याचे प्रदर्शन नाही, अश्लीलतेला थारा नाही, हे अभिनंदनीय !

शेतकऱ्यांचे व मजूर कामगारांचे आवडते नेते श्री. शरद जोशी यांचे विचार या अंकात वाचायला मिळाले. आम्हीही शेतकरी आहोत. आमचे पुष्कळ पुढारीही आहेत; पण असा नेता आम्हाला कोठेच मिळणार नाही. त्या महापुरुषाला आमचे धन्यवाद व आभार पोचवावेत ही विनंती.

१० नोव्हेंबर ८० अर्जुन पुंजु पाटील
मु. पो. खडकीसीम
चाळीसगाव.

पुणे वार्ता

# जनता युवा मोर्चा-शिबिर आणि कृती

अरुणा ढेरे

दिनाक सव्वीस ऑक्टोवरची सकाळ. शिवाजीनगर वसस्थानकाशेजारचे भारत इंग्लिश स्कूल तरुण मुला-मुलींच्या उत्साही धावपळीचे केंद्र बनले होते जनता युवा मोर्चाच्या महाराष्ट्रभरच्या कार्यकर्त्यांचे एक अभ्यासशिबिर सव्वीस आणि सत्तावीस ऑक्टोवरला तिथे अयोजित करण्यात आले होते.सगळ्या वेगवेगळ्या जिल्ह्यामधून जवळजवळ चारशे कार्यकर्ते आलेले. नेहमीच संघ-जनसंघीयाच्या मेळाव्यात आढळतो तसा भरपूर उत्साह, चोख व्यवस्था आणि शिस्तीचे नियोजन. कोणाही शुद्ध भारतीय जनता पार्टीच्या माणसाला सुखावेल, कौतुक करायला लावेल असे वातावरण. 'आपलेपणा'च्या भावनेने त्याच्याशी जोडल्या गेलेल्या प्रत्येकाला समाधान देणारी सामुदायिक हवा.

थोड्या तिऱ्हाईत, परक्या नजरेने पाहू गेले, तेव्हा कुतूहल जागे झाले ते सभागृहाच्या दर्शनाने. दारातून आत शिरताच दोन्ही बाजूच्या भितीवर लावलेली पोस्टर्स होती. यांवर काही समाजचितकाची वचने होती. या वचनाची निवड आणि त्याहीपेक्षा ती वचने उच्चारणाऱ्या चितकांची निवड ही एक लक्षणीय गोष्ट. जयप्रकाश, दीनदयाळ, लोहिया, फुले, आवेडकर याचा त्यात समावेश होता समोर मंचावर अगदी साधे शब्द- 'जनता युवा मोर्चा, अभ्यासशिबिर २६-२७ ऑक्टोवर' आणि पाच प्रतिमा. आवेडकर, फुले, जयप्रकाश, दीनदयाळ आणि महात्मा गाधी याच्या. निश्चित रीतीने इथे कुठे तरी काही तरी वेगळे जाणवू लागलेले; पण काय ?

कार्यक्रमपत्रिका हाती आली भरगच्च कार्यक्रम तासभराचीही मोकळीक न देता सकाळी ८-९ पासून संध्याकाळी ६-७ पर्यंत वाधून ठेवणारा वक्त्याची यादी पाहिली: मेघराज जैन, कलराज मिश्र आणि सिकदर वख्त याच्या जोडीला दि वि. गोखले आणि नीळकंठ रथ हीही नावे. मघाशी जाणवू पहाणारे वेगळे काही तरी आता आणखी गडद झाले. सप्टेंबर महिन्यात 'दिनमान' साप्ताहिकाला दिलेल्या एका मुलाखतीत भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष अटलविहारी वाजपेयी म्हणाले होते, 'असहिष्णुता दरवाजे वंद कर देती है। सकीर्णता विकासको रुद्ध करती है। हमें अपने दरवाजे खोलने पडेंगे। दृष्टिको व्यापक और विस्तृत वनाना पडेगा।' या विधानाची स्पष्ट-अस्पष्ट प्रतिविंवे तर मला 'वेगळी' म्हणून भावत नव्हती ?

मुळात ही अभ्यासशिविराची कल्पनाच उपयुक्ततेच्या कसोटीवर उतरणारी.

आज राजकारण आणि समाजकारण यांना जोडणारे सगळे पूलच उडवले गेले आहेत. त्यामुळे राजकारणाचा समाजहितैषी विचार होऊ शकण्याची शक्यता संपुष्टात आल्यासारखी वाटते. सगळ्या सामाजिक प्रश्नाचा विचार जेव्हा सत्तासघर्षात नाचवण्याची प्यादी म्हणून केला जातो, तेव्हा सामान्य माणसाला फसवणूक आणि नागवले गेल्याची जाणीव-यातून जन्मलेल्या भीतीचा, तुच्छतेचा, उवगलेपणाचा वेढा पडतो. त्यातून त्याला बाहेर काढणे फार कठीण जाते ! त्या असहाय्य स्थितीत सम्यक् विचारांची दिशा नसताना, नेतृत्वाचा मानदंड दिसत नसताना, निर्माण होणाऱ्या नित्य नवीन समस्या अधिकाधिक भयानक परिस्थितीला जन्म देतात

ही परिस्थिती बदलायची असेल, तर प्रथम तिचे स्वरूप, तिची कारणे आणि आपल्याला ज्या दिशेने ती वदलायची आहे ती दिशा हे सर्व स्वच्छ असले पाहिजे आणि हेच उद्दिष्ट समोर ठेवून महाराष्ट्रभरचे युवक कार्यकर्ते गोळा करण्याची संयोजकाची कल्पना. यात नेहमीच्या साचेवंदपणाच्या भिंती पारदर्शक झाल्या आणि वास्तवाचा खुला विचार करण्याची मनोभूमी प्रथम आवश्यक मानली गेली.

भारताची आर्थिक स्थिती, अर्थविकासाची भारताची दिशा, देशातील वेरोजगारीची समस्या, आंतरराष्ट्रीय सत्ताप्रवाह, आजचे राजकीय आव्हान, समतेचा लढा हे विषय याची साक्ष देतील याशिवाय पक्षवाधणीकडे


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष** : विसावे

**अंक** : पंचवीसावा

२२ नोव्हेंवर १९८०

**किमत** : एक रुपया

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीवावतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस,**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी ४४३४५९

जाणारे 'भारतीय जनता पार्टीच्या पंचनिष्ठा' आणि 'कार्यकर्ता' हे दोन विषयही होते. या सर्व विषयावर भाषणे होणार होती, त्या भाषणाचे एकेक टाचण आणि विषयाशी संबंधित अशी माहिती, तक्ते, आकडेवारी, काही योजनांची माहिती, काही सामाजिक प्रश्नावरची चर्चा आणि कार्यकर्त्यांनी मुद्दाम अभ्यासली पाहिजेत अशा काही पुस्तकांची यादी या सर्व गोष्टींची एक फाइल प्रत्येक कार्यकर्त्याला दिली गेली होती. पुस्तकांची यादी पाहिली, तर शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय सर्व अंगांचा विचार वेगवेगळ्या बाजूंनी करणारी चरित्रात्मक, इतिहासात्मक, शास्त्रीय, चिकित्सक अशी पुस्तके लोकहितवादी, धनंजय कीर, फुले, आंबेडकरांपासून आधुनिक दलित लेखक, लोहिया, नाथ पै, नलिनी पंडित आणि दि. के. बेडेकर यांच्यापर्यंत.

या शिबिराच्या निमित्ताने मला इथे येणारा मोकळा वारा नव्याने जाणवू लागला. एकतर अभ्यासशिबिर असे या कार्यकर्त्यांनी प्रथम घेतले आणि तेही असे मोकळ्या विचारासाठी घेतले. प्रत्येक भाषणानंतर प्रश्नोत्तरांना वेळ दिला.

गोखले इन्स्टिट्यूटचे संचालक आणि आर्थिक प्रश्नाकडे वास्तववादी दृष्टिकोनातून पहाणारे अर्थतज्ज्ञ डॉ. नीळकंठ रथ पहिल्या दिवशी सकाळी उद्घाटनाच्या कार्यक्रमात भारताच्या आर्थिक स्थितीसंबंधी बोलले.

'टेक्नॉलॉजी सर्व तयार आहे, आता तिचे फक्त उपयोजन करायचे,' ही गेल्या तीस वर्षांतली विचारणी आज पुन्हा तपासण्याची वेळ आली आहे. भारतातील जनता आणि राष्ट्रीय उत्पन्न यांचा सध्याचा मेळ फार चमत्कारिक आहे. समाजातल्या अगदी मूठभर वर्गाकडे पैसा जातो आणि बाकी सर्व लोक कितीक वर्षे जसे आहेत, तसेच राहतात. एकीकडे गेल्या तीस वर्षांतला सरासरी उत्पन्नाचा निर्देशांक पाहिला, तर भारताचा वर्षाचा उत्पन्न-निर्देशांक ३॥ टक्के वाढत असला तरी लोकसंख्येची वाढ फार मोठी आहे. त्यामुळे इतर काही देशांशी तुलना करताना आपले उत्पादन अधिक दिसत असले तरी आपल्या गरजांच्या तुलनेत ते फारच कमी आहे.

ही स्थिती बदलायची असेल तर धोरणात बदल हवा. जास्तीतजास्त जमीन पाण्याखाली यायला हवी. इरिगेशन शेतीला आणि त्याचबरोबर पर्यायाने पैशाच्या विभाजनालाही चांगली मदत करू शकेल. अर्थात आर्थिक प्रश्न हा केवळ आर्थिक नसतो. तो राजकीय आणि सामाजिक प्रश्नही असतो. म्हणून उघड्या डोळ्यांनी इथल्या परिस्थितीचा विचार करून आणि त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेकडे लक्ष पुरवून आपले आर्थिक धोरण आपण आखायला हवे. याची जाणीव करून देताना डॉ. रथ यांनी आकडेवारीसह आजच्या भारतीय अर्थकारणाचा आढावा घेतला.

भारतीय जनता पक्ष आजच्या आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोणते धोरण ठेवणार आहे आणि त्याचा मुख्य भर कोणत्या गोष्टीवर असणार आहे, याचे स्पष्टीकरण दुपारी भा. ज. प. चे महाराष्ट्रातले श्रेष्ठ नेते श्री. प्रभाकरपंत पटवर्धन यांच्याकडून मिळाले.

त्यांनी सुरुवातीला केंद्रित अर्थोत्पादनपद्धतीमुळे परिस्थितीत घडलेला बदल आणि त्यातून डॉ. रथांनी निर्देशित केलेला पैशाच्या विभाजनाचा असमतोल याचे विवेचन केले. व्यापाराचा समतोल कसकसा बिघडला आणि केवळ आर्थिकदृष्ट्या वंचितच नव्हे, तर स्वातंत्र्यापासून आणि स्वाभिमानापासून वंचित झालेल्या माणसाची मनोवस्था सामाजिक अशांतीला जेव्हा आपोआप जन्म देते, तेव्हा अर्थकारणाचा प्रश्न अधिक गंभीर कसा झाला याचे चित्र उभे केले. सुधारणांच्या 'बेकारभत्त्या'सारख्या मलमपट्ट्यांनी काही काळ जखमा भरल्यासारख्या वाटल्या, तरी बऱ्या होत नाहीत. म्हणून आम्ही काही मूलभूत विचारच केला पाहिजे. तो आम्ही करणार आहोत का, हा खरा प्रश्न आहे.

या प्रश्नाचे उत्तर म्हणून छोट्या उद्योगधंद्यांची वाढ आणि सामान्य माणसाला स्वयंपूर्ण करण्याची गांधीवादी उपाययोजना याची वाट धरण्याचा सल्ला पंतांनी आपल्या भाषणात दिला. सामान्य माणसाची क्रयशक्ती वाढवणारे छोटे धंदे, मोठ्या उद्योगधंद्यात विश्वस्त संकल्पना आणि सहकार यामुळेच बिघडलेला आर्थिक तोल सावरणार आहे म्हणून अॅग्रो-इंडस्ट्रियल सोसायटीची कल्पना आपण राबवली पाहिजे.

अर्थात या आर्थिक उपयोजनांची बैठक ही अखेर राष्ट्रवादाचीच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादातून सहकाराला पुष्टी मिळते; समूहाची समंजस भावना वाढीस लागते आणि 'सगळा देश माझा आहे' या भावनेने देशाच्या संपन्नतेसाठी प्रत्येक जण धडपडू लागतो, म्हणून राष्ट्रवादाची विचारपूर्वक बांधणी केली पाहिजे.

आर्थिक प्रश्नाचा धागा ज्यात गोवलेला आहे अशी बेरोजगारीची समस्या श्री. प्रकाश जावडेकरांनी पद्धतशीर विश्लेषणासह मांडली. त्यात देशातल्या बेकारांची संख्या, त्यांचे प्रकार आणि बेकारीनिर्मूलनाचे आजवरचे प्रयत्न, त्यातील त्रुटी यांची माहिती दिली. चुकीचे नियोजन, चुकीचे आर्थिक धोरण आणि चुकीच्या शैक्षणिक धोरणामुळे गंभीर बनलेली बेकारीची समस्या सोडवण्यासाठी काही ठोस उपाय त्यांनी सुचवले. हे उपाय अगदी तळातल्या माणसापासून-संस्थापासून ते थेट राष्ट्रीय धोरणापर्यंत सर्वांत बदलाची आणि कार्यक्षमतेची मागणी करणारे उपाय आहेत.

देशात वापरले जाणारे उत्पादनतंत्र बदलणे, रोज विकास पावणाऱ्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेऐवजी साध्या प्रभावी पद्धती वापरणे, मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील उत्पादक कामे चालवणे, ग्रामीण व शहरी तरुणांना मोठ्या प्रमाणाव प्रशिक्षित करणे, छोट्या व ग्रामीण उद्योगधंद्यावर, भर, शेती व शेतीला जोडलेल्या उद्योगांवर भर, नियोजनाची बेकार व गरीबांचा विचार करणारी दिशा ठरवणे असे अनेक उपाय अर्थतज्ज्ञांची मते मदतीला घेऊन सुचवले गेले. युवकांपुढच्या महत्त्वाच्या समस्येविषयी त्यांच्या प्रश्नांमधून त्यांचा गोंधळ जसा दिसून आला, तसा त्यांचे निराकरण करून उपाययोजनेबाबत त्यांच्या पुढे एक निश्चित कार्यक्रमही या वेळी ठेवला गेला.

'आर्थिक' शीर्षकाखाली मोडणारी ही तीन भाषणे.

राजकीय विषयावरच्या भाषणाची सुरुवात 'महाराष्ट्र टाइम्स'चे उपसंपादक श्री. दि. वि. गोखले यांनी केली. सध्याच्या आंतरराष्ट्रीय सत्ताप्रवाहांची ओळख त्यांनी करून दिली. रशियाचे आक्रमक तत्त्वज्ञान, अमेरिकेचे शांततावादी - धोरण, अलिप्त राष्ट्रांचा दुबळा ठरू पहाणारा अलिप्ततावाद

आणि मुस्लीम राष्ट्रांचे धर्मवेडे तत्त्वज्ञान यांची आजची जागतिक राजकारणातील पावले दाखवताना, अफगाणिस्तानचे आणि तेलसंपन्न राष्ट्रांच्या युद्धाचे प्रकरणही त्यांनी ओझरते चर्चिले. या चार मुख्य प्रवाहांमध्येही आता दुही कशी आहे, हे चीन-रशिया विरोध, अफगाणिस्तान प्रकरणातले अमेरिकेचे निष्प्रभपण, अलिप्त राष्ट्रांच्या दडपणाखालच्या हालचाली आणि असहाय्यता आणि मुस्लिम राष्ट्रांची आपसातली युद्धे यांवरून लक्षात येईल. सध्याच्या इराण-इराक-युद्धाचा फायदा इस्रायल उठवेल, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली आणि आपली शक्ती वाढवून नजीकचे उद्दिष्ट साध्य करावे नि एकमेकांना शह द्यावा असे सध्या चालू आहे, तसेच पुढे चालू राहण्याचा संभव बोलून दाखवला.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या या पार्श्वभूमीवर भारतातील वर्तमान राजकीय स्थितीचा आढावा घेतला भा. ज. प. चे तरुण आणि प्रभावी वक्ते श्री. प्रमोद महाजन यांनी. समर्थ नेत्याने चालवलेले आजचे असमर्थ सरकार आणि जातीय दंगली, आसामसह पूर्वांचलाचे प्रश्न, वृत्तपत्रे—न्यायसंस्था यांचे संकुचित होणारे स्वातंत्र्य, राज्यपद्धती बदलण्याची इंदिरा गांधींची सूचना, भडकती महागाई, कायदा व संरक्षण यांची अंतर्गत व्यवस्था यांतून कोणताही एक पक्ष राष्ट्रीय पातळीवर, जनतेला दिलासा देणारा विश्वासू पक्ष म्हणून आज उभा नाही. आपण असा पर्यायी पक्ष म्हणून उभे राहण्यासाठी लोकांचा विश्वास मिळवला पाहिजे आणि आजचे राजकीय आव्हान स्वीकारले पाहिजे, ही काळाची गरज आहे. यासाठी आपण विचारपूर्वक पावले उचलली पाहिजेत, त्यांना गती दिली पाहिजे आणि संघटित प्रयत्नांचे निश्चित फलित लोकांच्या हाती दिले पाहिजे. यासाठी तयार होण्याचे आवाहन त्यांनी युवकांना केले.

या आवाहनाला उत्तर म्हणून उद्या हे युवक कार्यकर्ते काम करणार असतील, तर भारतीय जनता पक्षाच्या पंचनिष्ठांची बैठक त्यांनी प्रथम आपल्या कामाला द्यायला हवी म्हणून प्रा. सौ. सुशीलाताई आठवले यांनी या पंचनिष्ठांचा पुनरुच्चार केला. राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, गांधीवादी समाजवाद, आणि सिद्धान्तावर आधारित राजनीति या त्या पाच निष्ठा.

तत्त्वशून्य राजकारण हाच आज स्थायीभाव बनला असता काही मूल्यांचे राजकारण करू पाहणारे हे युवक कार्यकर्ते समाजाशी बांधिलकी मानतात; स्वार्थाशी नव्हे. सिद्धान्ताशी बांधिलकी मानतात; सत्तेशी नव्हे. चारित्र्याशी आणि त्यागाशी बांधिलकी मानतात; लबाडीशी आणि भ्रष्टतेशी नव्हे!

हे विचार कार्यकर्त्यांना नुसते सांगितले पाहिजेत, असे नव्हे तर त्यांनी ते पचवले पाहिजेत. खासदार रा. का. म्हाळगी यांनी यासाठी एक अभिनव कल्पना मांडली. त्यांनी कार्यकर्ता कसा असावा यावर नुसते एक मोठे व्याख्यान देण्याची नेहमीची प्रथा दूर सारली आणि कार्यकर्त्यांचे छोटे छोटे गट करून पाच-सहा काल्पनिक प्रसंग त्यांच्यापुढे ठेवले. त्या त्या प्रसंगी सामाजिक काम करू इच्छिणारा माणूस कसा वागेल, कोणते निर्णय घेईल यांविषयी तरुणांनी चर्चा केली आणि मग त्यांच्या प्रतिक्रिया समोर ठेवून म्हाळगी बोलत गेले. चुकीची दिशा वळवून योग्य करीत गेले. [ पृष्ठ २४ वर


# ओळखा पाहू आज आम्ही काय आणलंय ते!

माझा वाढदिवस होता त्या दिवशी. ऑफिसमधून घरी आल्यावर हिनं माझे डोळे झाकून हा पहिला प्रश्न विचारला. सारंच अनपेक्षित असल्यानं मी बुचकळ्यात पडलो. हरलो म्हणताच तिनं सारं काही सांगितलं.

मी तिला विचारलं— 'इतके पैसे आणलेस कुठून?'

तेव्हा तिनं सांगली बँकेत रिकरिंग खात्यात वर्षभर दरमहा पैसे भरत होते एवढंच सांगितलं. किती पैसे भरते ते मात्र गुपितच ठेवलं. मला तिच्या कल्पकतेचं कौतुक वाटलं. आता मीही तिच्या पुढच्या वाढदिवसाला भारी किमतीची वस्तु भेट देणार आहे. त्यासाठी सांगली बँकेत रिकरिंग अकौंट उघडीन. तिच्या वाढदिवसाला मीही तिचे डोळे झाकून विचारीन.

'ओळख पाहू. आज मी काय आणलंय'

पण या वाक्याचं कॉपीराइट तिचंच असेल.




आपल्या उत्कर्षातील साथीदार

दि सांगली बँक लि.

रजि. ऑफिस-राजवाडा चौक, सांगली

चेअरमन : एम. आर. खटावे

# सामाजिक शांतता व सामंजस्याचा पारितोषिक-विजेता जेव्हा पेटतो....

धरमचंद चोरडिया

'पायातले पायताण पायात ठेवा, डोक्यावर घेऊन नाचू नका' अशी घोषणा देणारा एक मोर्चा दि २५ ऑक्टोबर रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील चादीचे दागिने बनविण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या हुपरी गावातील सवर्णीच्या एका जमावाने काढला. सवर्णीनी दलिताशी कसे वागावे आणि दलितांची पायरी काय, दोघाचे सबध कसे असावे याचे मार्गदर्शन या घोषणेद्वारे त्यानी केले आहे.

अशा घोषणा, मोर्चा, बद आणि त्यातून दंगल, जाळपोळी, लुटालूट असे जे प्रकार हुपरी गावात दि. २६ रोजी घडले ते सर्व गभीर आहेत. त्याचा शोध घेण्यासाठी हुपरीला भेट दिल्यानंतर लक्षात आले की कोजागरीच्या एका छोटयाशा घटनेच्या निमित्ताने ही अस्पृश्यविरोधी मनोवृत्ती उफाळून आली, तिचा प्रकट आविष्कार झाला

२३ ऑक्टोबरला कोजागरीनिमित्त दलित वस्तीजवळच्या पाण्याच्या टाकीजवळ काही प्रतिष्ठित व संपन्न घरातील युवक रात्री टेपरेकॉर्डर लावून त्याच्या तालावर नृत्य आदी करून धिंगाणा घालीत होते ते युवक प्यालेले होते असेही गावकऱ्याचे म्हणणे आहे. त्याना दलित बांधवांनी हे थाबविण्याची विनंती केल्यावरून बाचाबाची झाली आणि या युवकानी दलितांना जातिवाचक शिवीगाळ केली, दमदाटी दिली. त्यामुळे रजनीकात दत्ता काबळे याने पोलिसस्टेशनवर जाऊन तक्रार नोदविली व त्यानुसार पोलिसांनी सात युवकांना ताब्यात घेतले

हे सात लोक २५ तारखेला जामिनावर सुटले व गावात तणाव पुन्हा वाढला. त्याच दिवशी रात्री सुमारे एक हजार लोकानी गावातून मोर्चा काढला. 'पायातले पायताण पायातच ठेवा, डोक्यावर घेऊन नाचू नका' अशी घोषणा देत दलित वस्तीत व गावातून अनेक ठिकाणी त्यानी आरडाओरडा केला व रात्री उशीरा 'हुपरी बंद'ची घोषणा दिली.

२६ ला हुपरी बद होते. सकाळी दहाच्या सुमारास पुन्हा जमाव एकत्र झाला. वाढत वाढत तो पाच हजारापर्यंत वाढला. त्यामुळे दलित घाबरले गावाच्या बाहेर एका टोकाला असलेले दलित गावाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या बाधवाना भेटून मार्ग काढावा म्हणून १००–१५० च्या संख्येने निघाले असता हा जमाव त्याच्यामागे लागला जमावाच्या हातात रॉकेलच्या बाटल्या–बोळे होते असे गावकऱ्याचे म्हणणे आहे. या जमावाने पोलिसाना चुकवून उसाच्या शेताच्या बाजूने दलित वस्तीत प्रवेश केला व तेथील पाच निरापराध व गरीब दलिताच्या झोपडचा पेटवून दिल्या दोन–तीन घरातील भाडीकुंडी, कपडे, पाळणा इत्यादी साहित्य बाहेर काढून पेटवले आणि प्रचंड दगडफेक केली मारहाण केली घर जाळण्यास प्रतिबंध करण्यासाठी आडवा आला म्हणून एका दलित युवकावर विळयाने वार केला गेला. मालाबाई गोरख कांबळे या विधवा निराश्रितेचे सारे काही भस्मसात झाले हे सर्व दृश्य हृदय पिळवटून टाकणारे होते.

त्याच सुमारास एस्. टी. स्टॅन्डजवळ दुसऱ्या एका जमावाने दलितांची खोक्याची दुकाने जाळली. विशेष म्हणजे एकाच रागेत अनेक दुकाने असताना त्यातून दलिताची दुकाने वेचून आतील साहित्य रस्त्यावर आणून जाळले गेले. शेजारची अस्पृश्येतराची मात्र दुकाने जशीच्या तशी आहेत या जाळपोळीत एका दलित शिप्याची चार मशीने, कपडे, सायकलदुकानदाराच्या सहा सायकली व तीन पान–विडीची दुकाने भक्ष्यस्थानी पडली. शिवणकामाच्या दुकानातील डॉ. बाबासाहेब आबेडकराचे पाच फुटी तैलचित्र काढून पायी तुडविले गेले व जाळले गेले. या सर्व गंभीर घटना हल्ल्याचा रोख स्पष्ट करणाऱ्या आहेत.

दंगलीत ज्याची घरे जळाली व ज्याची दुकाने उध्वस्त झाली ते सारे दलित होते. १) वामन दशरथ कावळे (शिलाई दुकान), १) मछींद्र पुडलीक काबळे (सायकल दुकान), ३) अशोक तुकाराम कावळे, ४) प्रल्हाद बळवंत काबळे, ५) खडेराव संभाजी काबळे व ६) कोडीबा कलप्पा काबळे (सर्व पानपट्टी दुकानें) ह्याची उपजिविका नष्ट झाली आहे

१) मालुबाई गोरख काबळे, २) पाडुरंग आनदा काबळे ३), केरबा दुधप्पा काबळे ४) विष्णू सावळा काबळे ५) अब्दुल बेपारी ह्याची घरे उध्वस्त झाली आहेत. मधुकर दत्तात्रय काबळे हा २२ वर्षे वयाचा तरुण गंभीर जखमी झाल्याने कोल्हापूर हॉस्पिटलमध्ये आहे.

दगलीची सूचना पोलिसाना लवकर मिळू नये म्हणून टेलिफोनतारा तोडणे हा घातपात, कुमक येऊ नये म्हणून डांबराच्या टाक्या रस्त्यावर फोडणे इत्यादी प्रकारही झाल्याचे कोल्हापूरच्या दैनिक 'पुढारी'मध्ये प्रसिद्ध झाले आहे. या सर्व गोष्टी दगल पूर्वनियोजित असल्याचाच पुरावा आहे.

पोलिसांनी दंगल म्हणून जरी नोदवली तरी ही सामान्य दगल नसून नागरी हक्क

सुरक्षा कायद्याखाली त्याची नोद होऊन कडक कारवाई होणे आवश्यक आहे. आम्ही प्रतिष्ठित पैसेवाले आम्हाला अटक होते, आणि तीही दलितांच्या तक्रारीमुळे म्हणजे काय, या वृथा अहकाराने दुखावल्या गेलेल्या काही सवर्णांनी सूड भावनेने पेटून माणुसकीला लाजवणारे हे सारे कृत्य केले, तरी पण दलितांनी संयम पाळला व कायदा आपल्या हातात घेतला नाही हे मात्र विशेष.

ता. २३ रोजी झालेल्या घटनेमुळे सात लोकाना व ता. २६ रोजी दंगलीच्या वेळी जे सापडले अशा पन्नास लोकाना अटक करण्यात आली आहे. मात्र ता २५ रोजी ज्यांनी बैठक घेऊन, मोर्चा काढून 'बंद' चे आवाहन केले व 'बंद' घडवून आणला ते कोण ? ते सारे या कटाचे सूत्रधार आहेत व तरीही अजून बाहेर आहेत. इतकेच नव्हे तर ते व त्याचे हितसंबंधीय लोक शांतता-समित्याचे सदस्य आहेत असे गावकरी म्हणतात. त्यामुळे गुन्हेगारांना एक प्रकारचे संरक्षणच मिळाले आहे. ही बाब गंभीर आहे. ह्याला पुरावाही आहे. शांततासमितीची बैठक झाली व त्यात दुकाने व व्यवहार सुरू करण्याचे आवाहन केले; पण त्या पत्रकात ज्याचे नुकसान झाले त्याबद्दल एका शद्वाने निषेध तर राहोच, पण साधा खेद वा दु.खदेखील व्यक्त केलेले नाही. जे लुटले गेले, निराधार झाले, त्यांच्या पुनर्वसनासाठी मदतीचा काही उल्लेख नाही. उलट ज्यानी एवढे भीषण व हिंमक गुन्हे केले त्यांना वाचविण्यासाठी ते सर्व खटले, तक्रारी मागे घ्याव्यात अशी मागणी करून, शांततेची ढाल पुढे करून सामाजिक न्यायाचा गळा घोटण्याचीच सारी धडपड दिसून येते.

या ममुद्यावर ज्याच्या सह्या आहेत त्यांनी देखील आपली दुकाने सुरू केली नसून किराणा, धान्य, पिठाची गिरणी इत्यादी बद ठेवून गोरगरीब व दलिताची कोंडी करण्याचे कार्य सुरू ठेवले आहे. त्यामुळे ही शातता-समिती नमून गुन्हेगार संरक्षण-समिती आहे की काय असाच प्रश्न निर्माण झाला आहे.

ता. २८ रोजी सायकाळी म्हणजे तिसऱ्या दिवशी पुण्याचे नगरसेवक श्री. नारायणराव वैद्य व जनता युवा मोर्चाचे उपाध्यक्ष श्री. मधु पवार याच्यासमवेत जेव्हा गावात शिरलो तेव्हा स्मशानवत शांत होते. कोणीही बोलण्यास तयार नव्हते. ज्या दलितांचे नुकसान झाले त्यांना भेटलो; पण त्यांनीही संताप वा चीड व्यक्त केली नाही. त्याचे केविलवाणे चेहरे आणि भेदरलेले डोळे ते किती भयग्रस्त आहेत हे व्यक्त करीत होते. उद्या आपल्या घरात चूल कशी पेटेल, जीवनावश्यक वस्तूची दुकाने कधी उघडतील, उघडली तरी माल मिळेल का, आपले मालक आपल्याला कामावर घेतील का अशा प्रश्नांनी ते घेरलेले आहेत 'साहेब, काय करणार, आम्हाला गावात राहायचे आहे' ही तेथे उपसरपच असलेल्या श्री. चंद्रकात कावळे याची प्रतिक्रिया.ही प्रातिनिधिक होती. त्यामुळे गावात निर्भय वातावरण निर्माण झाल्याशिवाय व दलिताना अभय दिल्याशिवाय खरे गुन्हेगार कोण, बैठका घेऊन मोर्चे, बंदचे नेतृत्व करणारे कोण, कोणी तणाव वाढवला, आयुष्यभर कावाडकष्ट करून ज्यांनी एक छोटेसे झोपडे उभे केले ते जाळणारे–भाडी–कुडी, कपडे व लहान मुलाचा पाळणादेखील जाळणारे–माणुमकीचे शत्रु कोण, हे कळणार नाही. ह्याची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे.

महाराष्ट्र शासनाने संख्येने कमी आहेत, दुर्बल आहेत त्याना केवळ सलोखा वा शांततेचा सल्ला न देता हा सामाजिक अन्याय सहन केला जाणार नाही व गुन्हेगाराना शोधून कडक शासन केले जाईल, त्यासाठी कुठलेही राजकीय दडपण वा मताचे राज–कारण आड येणार नाही अशी ग्वाही दिली पाहिजे व तशी कृती केली पाहिजे. दमदाटी व कोंडी करण्याचे प्रकार अजूनही सुरू आहेत, ते थाववले पाहिजेत.

दलित बाधव निराधार झाल्यानतर तीन दिवसांनी शासनाने त्या पाच कुटुवाना रोज तीन रुपये प्रत्येक माणशी डोल व ४५ रु. भाड्यासाठी अशी तुटपुजी मदत दिली आहे! त्यांना तातडीने वेधर योजनेतून घरे उभारून द्यावी. दुकानदारांना नव्या योजनेनुसार २५०० रुपयाचे विनव्याजी कर्ज प्रथमत द्यावे. जीवनावश्यक वस्तूची दुकाने सुरू व्हावीत. दलित वस्तीत शासनाने स्वस्त धान्याचे दुकान सुरू करावे अशी मागणी जिल्हाधिकाऱ्याकडे केली आहे अर्थात केवळ जिल्हाधिकाऱ्याच्या आवाक्यातला हा विषय नाही. दलित बाधवाचे पुनर्वसन व्हावे म्हणून मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातले पाहिजे. सामाजिक व राजकीय संस्थानीही या कामी पुढाकार घेतला पाहिजे.

या हुपरी गावात ज्याना अटक झाली त्याना सोडविण्यासाठी काही लोक वर्गणी जमवितात; पण दंगलग्रस्त-निराधार दलिता–साठी मात्र काही नाही. याला उफराटे काळीजच म्हणावे लागेल!

जेव्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शकरराव पुजारी, इचलकरंजीचे रमाकात शालगर, हणमंत सागर, हातकणगले तालुका अध्यक्ष घोडेस्वार व स्थानिक कार्यकर्ते प्रकाश देशपांडे यानी तातडीने एक आठवडा पुरेल इतका तादूळ, जोंधळा व पाघरुणे अशी मदत पोचविली. 'मदत घेऊन आमच्याकडे येणारे तुम्ही पहिलेच' या भाषेत आपद्ग्रस्त बाधवानी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली; पण खऱ्या अर्थाने प्रश्न सुटायचा असेल तर या गावातल्या लोकानीच कोण चूक, कोण बरोबर हा वाद तूर्त बाजूला ठेवून मानवतेच्या भूमिकेतून पुनर्वसनाची सारी जबाबदारी स्वीकारली पाहिजे,तरच मनोमीलनाची प्रक्रिया सुरू होऊ शकेल.

सामाजिक शातता व सामंजस्याचे पारितोषिक या गावाला आठ–दहा वर्षांपूर्वी मिळालेले आहे, याची थोडी तरी जाण सर्व गावकऱ्यानी ठेवावी.

हुपरी येथील एका प्रतिष्ठित डॉक्टराची भेट झाली. व्यथित अत.करणाने त्यानी विचारलेला प्रश्न मात्र मूलभूत होता 'पदव्या घेतलेली, शिकलेली मुले, आजची ही नवी तरुण पिढी या जातीयवादी भूमिकेचा पुरस्कार करतात,' पायातले पायताण पायातच ठेवा' असे म्हणतात! ह्याना का शिकवावे ? विद्यापीठावर कोटयवधी रुपये तरी खर्च का करावे ? त्याचा उपयोगच काय ? शिक्षणाने त्याच्या सामाजिक जाणिवा व्यापक का झाल्या नाहीत ? ज्यानी समाजाचे प्रवोधन केले पाहिजे त्याचेच आज प्रवोधन करण्याची वेळ आली आहे.' डॉक्ट–रानी विचारलेले प्रश्न अजूनही बोचताहेत. ते विसरणे, शक्य नाही. या प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी प्रबोधन व संघर्ष गतिमान करण्याचे दायित्व युवकानी, सुधारकानी स्वीकारले पाहिजे.

□

कथा

# लोन

सौ. मीना लवाटे

"वास्, वास्, वास् ! अगदी आता माझ्याच्यानं रहावत नाही हं. आज प्रमोशन मिळेल, पुढल्या महिन्यात दादाच्या विमा पॉलिसीचे पैसे येतील, मग आपण लग्न करू. अशी दररोजच कारणं सागत असतोस. अक्षरशः त्या पिक्चरमधल्या नायिकेसारखं म्हणावंस वाटतं की, 'तेरी दो टकियो की नोकरी मेरा लाखोका सावन जाये। हाय हाय ये मजबुरी."

हा वरचा परिच्छेद एक प्रेयसी आपल्या प्रियकराला जोरजोरात सागत होती. तशीच बाग, तेच आव्याच झाड, हो आणि शेजारी गुलमोहराचसुद्धा झाड होत. त्याच्या प्रेमाचं प्रतीक--डवरलेलं.

परिस्थितीच तशी बिकट होती. अपर्णा, अभिजित दोघाच एकमेकावर फार प्रेम होतं. अगदी 'लव्ह अॅट् फस्ट साइट' की काय म्हणतात तस. मग त्या प्रेमाच्या आणा-भाका-करीन तर लग्न तुझ्याशीच वगैरे वगैरे. पण अडचण अशी होती की दोघाम्हाही पगार कमी, जागा लहान आणि आई-वडलानी देवाची देणगी ह्या नावाखाली वाढवलला प्रपच ! अभिजितने अपर्णाच्या घरी रहायला यायच तरी खोली एकच आणि अपर्णाने सासरी जायचं म्हटल तरी खोली एकच. ह्यात पर्याय शोधून काढणं फारच कठीण होऊन बसल. मग काय करावं ? अपर्णाच लग्न करण्याचा तर आई-वडलानी चगच बाधला होता आणि अपर्णाला तर अभिशिवाय अगदी देवाचा राजा इंद्रसुद्धा नको होता !

"मग काय ठरलं अभि तुझं ? बोल ना रे काही तरी. अस रे काय करतोस ?" अपर्णाचे डोळे पावसाची पहिली सर कोसळण्याच्या बेतात होते.

"तू म्हणतेस तसं करू. आता हास पाहू एकदा. हो एकदा का बायकांनी दुधारी शस्त्र बाहेर काढलं की समोरच्या माणसाचा अगदी फालूदा!"

आणि मग नवी जागा. अगदी चार खोल्याचा ओनरशिप नसला तरी दोन टुमदार खोल्या. पनवेलजवळ जुळया मुंबईत मिळाल्या. राजा-राणीचा ससार सुरू झाला आणि त्या ससाररथाची दोन चाक वेगानं फिरायला लागली. आता सकाळी पाचला उठणं आल. नाही तर लेक नोकरी करते, चार पैसे कमवत ह्या नावाखाली आई लेकीचं कौतुक सकाळी उठून, डबा करून काही तरी खायला करत असे. अगदी रुमालाची घडीसुद्धा हातात देई; पण आता तस नव्हत. रात्राच्या जागरणाने डोळे चुरचुरत तरी लवकर उठून पाणी तापवाव लागे. त्यात कधीकधी स्टोव्हच बिघडे. मग "थडे थड पानी से." म्हणत अभिजित आघोळ उरके. पाव आणि आदले दिवशीच्या भाजीचा नास्ता होई. ६-२५ ची सिडको कशी-बशी पॅन्टचा पट्टा बाधत-बाधतच पकडावी लागे.

तीच गत अपर्णाची. लग्नाआधी साडीच्या चार चार वेळा निऱ्या करून चापूनचोपून साडी नेसणारी अपर्णा आता कशी तरी निरवानिरव करून गाडी गाठत असे. अपर्णा आता एका कपनीत टायपिस्ट-कम्-क्लार्क होती. महिना साडेचारश रुपये प्राप्ती आणि अभिजित बँकेत. सातश रुपये प्राप्ती. दोघाचे मिळून चार आकडी जमत. आकडा जरी चारचा असला तरी त्याला वाटा शभर असत. शिवाय लग्नासाठी आणि जागेसाठी काढलेल्या लोनचा हप्ता !

तरी दोघाच्याही घरी लग्नाला कडाडून विरोध होता. परस्पर सह्या ठोकून दोघही लग्न करून आले आणि वेगळे राहिले.

"अगदी कटाळून गेले बाई मी स्टोव्ह पेटवता पेटवता. मेली रोजचीच कटकट. अहो, उठा आता. बघा जरा पिन करून. माझ्याच्यान काही पेटत नाही बाई !"

चुटक्या वाजवत जाभया देतच अभि उठला. "काय करता, घर पहाव बाधून आणि लग्न पहाव करून !" जाऊ दे, काय साला वैताग आहे. आज तू काहीच करू नकोस. आपण आज पण बाहेरच जेवू या!"

'हो, म्हणायला काय जातय? फक्त शभर रुपये उरलेत. आज १५ तारीख. अजून पंधरा दिवस जायचेत. काही नको. आपण आणिक लोन काढू या. म्हणजे आता बँकेकडून नाही मिळणार; पण मी आज बॉसला विचारेन. माझ्या पगारावर मिळेल. तीन हजार रुपये काढू या. म्हणजे गॅस आणि प्रेशर कुकर घेऊन टाकू. रोज रोज बाहेर जेवण परवडणार नाही !'

'अग ! पण माझं जरा ऐक !'

'इथ ऐकायला वेळ नाहीये. तुमची सिडको चुकेल. उठा. असं काय करता ? मी म्हणते ते बरोबर आहे'

परत अभिजित साखरेसारखा दुधात विरघळून गेला. काय करता? पदरी पडलं आणि पवित्र झाल.

आता मासिक हप्ता तीनशे रुपये झाला. रोज सकाळ-संध्याकाळ घरगुती जेवण. हॉटेलिंग बद, दाढी घरी आणि वेळ झाला नाही तर रविवारी. दोस्तलोक म्हणत, 'अरे यार, लोक प्रेमभग झाला कि देवदास बनतात. पण तू लग्न झाल्यावर देवीदास झालास म्हणून देवदासासारखा दिसायला लागलास!' तरी तिकडे अभि दुर्लक्ष करत असे.

¤

'काय ग, आज सकाळीच तुला काय व्हायला लागलं ?'

'काही नाही अभि. आज संध्याकाळी तू ६-५० ला माझ्या ऑफिसपाशी ये. आपण आजच डॉ पराजप्याकडे जाऊ या. अरे, फारच मळमळतय, चक्कर येईल असं वाटत. मी आज स्वैपाक करत नाही. दहा रुपये घे. चहा-जेवण सगळं बाहेरच उरकू या!'

¤

'काय ग अपर्णा, आज अशी मलूल दिसतेस. हल्ली रुजलिप्स्टिक तर नाहीच, पण अगदीच काकूबाई झाली आहेस ! ' इति डॉली.

'अग, तू तर अगदी हीच आहेस. आता लिपस्टिकची काय जरूर आहे ? आपोआप ओठ लाल होत असतील' दुसरामिस्किल स्वर पाठोपाठ हास्याचा धबबा.

¤

'सॉरी मिस्टर कुळकर्णी, मी तुम्हाला काही मदत करू शकत नाही. चार महिने होऊन गेले. पडिंग आहे होऊन जाऊ दे उगीच रिस्क घेऊ नका. मिसेसची प्रकृती लक्षात घेता धोका आहे !' हातातले हॅन्डग्लो-

व्हज काढता काढता डॉ. परांजपे सांगत होते. 'एरकंडिशनरूममध्ये असतानासुद्धा अभिजितला घाम फुटला होता.

¤

आता काही इलाज नव्हता. कामाला बाई ठेवण भाग होतं. अपर्णाला नोकरी करून सगळं घरकामही निभावणं शक्य नव्हतं. आता आणिक काटकसर करून पैसे जमवणं भाग होतं जगात सगळी नाटकं छान करता येतात, पण पैशाचं नाटकं करण फार कठीण असत. तरी डिलिव्हरीचार्ज कंपनी देणार होती म्हणन बरं. पण नंतर बाळाला सांभाळायला आया ठेवणं जरूर होतं. खर्चाचे मले मोठे राक्षस आ करून उभे होते. अल्लाउद्दीनच्या राक्षसासारखे मदतीला कुणीच नव्हत.

¤

आणि एकदाचं सगळं पार पडलं. अशा वेळेला आप्तस्वकीयापेक्षा मित्र जवळचे वाटतात. अपर्णाची ओढाताण बघवत नव्हती एक दिवस बाई आली नाही तर मुलाला शेजारी ठेवून जावं लागत होतं. नुसतेच भाजत नव्हते, तर हाताची सालडी जायची वेळ आली होती. एखादी लॉटरी लागेल म्हणावं तर आपलं नशीब तितकं जोरावर नव्हतं, पाणी नेहमी उताराकडे धाव घेतं तसा पैसा नेहमी पैशाकडेच धाव घेतो.


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०


ओव्हरटाइम अगदी रात्री अकरापर्यंत सुद्धा करण्याची अभिजितची तयारी; पण नऊ वाजले की घरदार, संसार, त्रासलेली अपर्णा दिसायची आणि घरी जावंसं वाटायचं. ह्या सगळ्या त्रासातून वाचायला घरी जावंसं वाटायचं. आई-आप्पाना सगळं सांगावं, त्याचा मदतीचा हात घ्यावा असं वाटायचं पण सुंभ जळला तरी पीळ अजून शिल्लक होता.

¤

रात्री आठ वाजता अभिजित घरी आला घरातलं दृश्य अगदी बघण्यालायक होत. सगळ्या घरभर दुपटी, झबली, टोपडी ह्याचा खच पडला होता. अभिचे धुवायचे कपडे खुटीवर बेवारशासारखे लोंबत होते. स्वयंपाकाचं टेबल तर प्रेक्षणीय होत कप-बशा, पातेली, भांडी, चहाच गाळणं ह्यानी एकत्र बसून गप्पा मारण्याचा कार्यक्रम जोरदार चालला होता. प्रशांत शांत न बसता मोठ्यादा गळा काढून रडत होता आणि अपर्णा पलगावर पाय पोटाशी घेऊन आडवी पडली होती. अभिजितच्या तळपायाची आग मस्तकात पोहचली.

'काय घर आहे की महारवाडा ? तू दमली आहेस, तसा मी पण दमलो आहे मी काही मजा मारत हिंडत नव्हतो आणि आता रडण्याचं काही एक कारण नाही. सगळं घर आवरून टाक. पाय ठेवायला सुद्धा जागा नाही!' अपर्णा उठली. साडी सारखी केली. प्रशातला कडेवर घेतलं. पात लवतं न लवतं तोच ती दारातून बाहेर पडली. अभिजितन तिला अडवायचाही प्रयत्न केला नाही.

'जायचं आहे तर जाऊ देत. त्यानं राहिलेला ब्रेड आणि दूध घेतलं आणि तशीच पलगावर ताणून दिली.

रात्री जोरजोरात कडी वाजविण्याच्या आवाजाने अभि दचकून जागा झाला. खालचे घरमालक हाका मारत होते. अहो अभिजित, उठा लवकर. तुमच्या मिसेसच्या पोटात दुखतंय त्याना मुंबईला दवाखान्यात न्यायला पाहिजे !'

अभिजितने कपडे घातले आणि तो तस्सा धावत खाली गेला. अपर्णा मासा जसा तडफडतो तशी तडफडत होती आणि काकू तिच्या शेजारी पाठीवरून हात फिरवत होत्या. अभिला काकू म्हणाल्या, 'अहो काल तुम्ही तिला बोललात आणि रात्रीची पोर बाहेर निघाली. कुठे जाणार ती ? म्हणून ठेवून घेतली. जेवायला घातलं. तरुण पोरं तुम्ही. म्हटल होईल राग सकाळपर्यंत शात. तर काय, रात्रीच कण्हायला लागली आणि आता तर तिला काही सहन होत नाहीये !'

अभिने घरमालककाकडून शंभर रुपये उसने घेतले. कारण महिनाअखेर. जवळ पैसे नाहीत. टॅक्सी करून हॉस्पिटलमध्ये गेले. डॉक्टरानी सगळ्या टेस्टस करून पाहिल्या आणि अभिला म्हणाले, 'मिस्टर कुलकर्णी, डिलिव्हरीच्या वेळी ह्याच सिझर करावं लागलं. त्या वेळेला ह्याच्या पोटाला थोडीशी जखम झाली आहे. त्यावर दगदग, हालचाल जास्त झाली त्यामुळे पोटाला ताण पडला आणि जखम भरून आली नाही. त्याचं सेप्टिक झालंय. ऑपरेशन डेंजरस आहे. आपण प्रयत्न करून बघू. साधारण खर्च पाच ते सहा हजार रुपये येईल!'

अभिला वाटलं, सगळं जग आपल्या भोवती गरगर फिरतंय. डॉक्टर म्हणाले, 'पैशाची काळजी करू नका. तुम्हाला जमजमतील तसे पैसे द्या!'

अभिला वाटलं, संसार म्हणजे करजीसारखा आहे बायको म्हणजे सारण आणि नवरा म्हणजे आवरण. सगळ्या आपत्तीचं चाक नवऱ्यानं आपल्यावर फिरवून घ्यायला पाहिजे म्हणजे आतल्या सारणाला धक्का लागणार नाही. फार बोललो का आपण अपर्णाला ? चिमणा-चिमणीनं जसं काडी काडी बांधून जमवलेलं घरटं. वारा आला की कोलमडून पडतं तसंच आपलं झालं. कधी हौस-मौज झालीच नाही ! अपर्णाला नोकरी सोडायला लावायची, आपण डबल नोकरी करायची. तिला फुलासारखं जपायचं, पण अपर्णा ह्यातून बरी होऊ दे. कितीही खर्च करायला लागला तरी मी करीन, पण परमेश्वरा, अपर्णाला बरी होऊ दे ! आजपर्यंत तुला कधी काही मागितलं नाही; पण आज मागतो. परमेश्वरा, सगळीकडून लोन काढून झाल. आता अपर्णासाठी माझ्या शिल्लक राहिलेल्या आयुष्यावर लोन दे!' अभिच्या डोळ्यातून घळघळ पाणी गळत होत आणि एका हातानं तो प्रशातला थोपटत होता. □

सुमारे आठ-दहा महिने चाललेलं आसाम-आंदोलन मध्यंतरीच्या काळात दबल्यासारखं वाटत होतं. पण आंदोलकांनी पुन्हा कंबर कसली आहे. त्या निमित्तानं आंदोलनाच्या पहिल्या टप्प्याची पार्श्वभूमी विशद करणारी व भविष्याचा वेध घेणारी ही खास डायरी.

# डायरीतले दिवस

## अविनाश धर्माधिकारी

पाच एप्रिल ऐशी–शनिवार रोजी 'सकाळ' ऑफिसमधला टेलिप्रिंटर धडधडत होता–Assam has been declared as disturbed area-लष्कराला विशेषाधिकार देण्यात आले आहेत.

आणि सहा एप्रिलला आमची 'उत्तर–पूर्वी सीमावर्ती रेल' धावायला सुरुवात झाली. कधी ब्रॉडगेजवरून, कधी मीटरगेजवरून किंवा ट्रक, एस. टी., जीप याचे रूळ करून वाटेतल्या वेगवेगळ्या स्टेशनावर भेटलेली माणस सर्व तऱ्हाची माहिती पुरवत गेले. मी आणि अजित कानेटकर अधाशासारखी माहिती गोळा करत गेलो. आघाडीवर घडामोडी वेगाने घडत होत्या.

### सहा एप्रिल–रविवार

इंद्रकुमार बारुआ नावाच्या गोहाटीतील नागरिकाने केन्द्र सरकारच्या निर्णयाला आव्हान दिलं गोहाटी हायकोर्टानं आसाम अशांततागस्त विभाग जाहीर करण्याच्या निर्णयाला 'स्टे' दिला ! बेकायदा मार्गाने भारतात घुसलेल्या परकी नागरिकाना हाकलून द्या, ही मागणी घेऊन उभे राहिलेले आसाम – आंदोलन अप्रतिहत चालू.

### बारा एप्रिल–शनिवार

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी गोहाटीत. आंदोलनाच्या नेत्यांबरोबर चर्चा–अर्थात असफल परकी नागरिक ठरविण्यासाठी आधार वर्ष ५१ की ७१ या मुद्द्यावर बोलणी फिस्कटली. I see that our country is to face more grave situation हे श्रीमती गांधीचे वाक्य तासभर चर्चा झाल्यावर श्रीमती गांधी नौगाव येथे रवाना झाल्या. तिथे त्यानी अल्पसंख्याकाच्या मेळाव्यापुढे मार्गदर्शन केले 'सरकारला आमचा प्रश्न सोडवायचाच नाहीये श्रीमती गांधी आम्हाला अतिमोत्तर द्यायला आल्या होत्या,' ही श्री. निवारण वोरा, अध्यक्ष पूर्वांचलीय लोकपरिषद यांची प्रतिक्रिया.

### सोळा एप्रिल–बुधवार

सर्व घडामोडीच्या पार्श्वभूमीवर आमच्या भेटी–मुलाखती-वाचन-अभ्यास वेगात चालू. रोज दिवसअखेर मी आणि अजित कानिटकर एकदा आंदोलनाचा आमच्याशी ताळमेळ जुळवून पहायचा प्रयत्न करतो. मिळणाऱ्या काही बातम्या आंदोलनाचा यापुढे फार काळ मेळ घालता येईल अशा अवस्थेत रहाणार नाही अशी भीती घालणाऱ्या आहेत.

एकूण काही खरं नाही !

### अठरा एप्रिल–शुक्रवार

ध्या आम्हाला ज्याची पूर्वकल्पना आली होती ते वळण आसाम आंदोलनाला मिळते आहे–गोहाटी उच्च न्यायालयाने स्टे काढून घेतला–लगेच आसाम 'अशांततागस्त विभाग' जाहीर. गोहाटीत संचारबंदी लागू गोहाटीजवळच्या नारिंगी ऑईल पंपिंग स्टेशनवरची निरोधने लाठीमार करून हटवली. राज्य चालविण्यासाठी लष्कर आणि केन्द्रीय राखीव पोलीस पाचारण. प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा लागू. आसाम छात्र परिषदेच्या (आसु') बैठकीसाठी जमलेल्या विद्यार्थी–नेत्याना अटक. रेल्वे बंद.

बातम्याच्याच वेगात आमचा अभ्यास-दौराही चालला होता. शेकडो भेटी, मुलाखती, सतत प्रवास, सर्व वृत्तपत्राचे वाचन. आपसात चर्चा करून नवे मुद्दे, नव्या शक्याशक्यताचा शोध. गोहाटी शिलाँग–काझीरंगा–जोरहाट – शिवसागर–दिब्रुगढ–धुलियाजान–तीनसुखिया दिमापूर-कोहिमा-इंफाळ-सिलचर-करीमगाज-लुमडिंग-गोहाटी असा प्रवास. सोबतीला आसामच्या इतिहासाचाही एका पुस्तकावरून प्राथमिक अभ्यास. इतिहासाच्या अभ्यासामुळे वर्तमानकाळातल्या घडामोडीचे धागे–दोरे जास्त स्पष्ट होतात हे माझं मत.

गोहाटीहून सुरू केलेल प्रवासाच वर्तुळ सिलचरला पोचलो तेव्हा तीनचतुर्थांश पूर्ण झालं. आंदोलनाच्या जवळजवळ सर्व बाजू स्पष्ट करणारी माहितीही हाताशी आली. आंदोलनाच्या बाजूनं, विरुद्ध आणि तिऱ्हाईत अशा सर्व माहितीच विश्लेषण करायला सिलचरमधे जरा शांतता मिळाली.

मी लिहायला सुरुवात केली.

ती दैनंदिनी इथे ठेवतो आहे. सर्व माहिती एका लेखाच्या स्वरूपात रूपांतरित न करता जशीच्या तशी दैनंदिनीची पाने उघडी करण्याचं कारण म्हणजे दैनंदिनीवर ललितसाज चढविण्याची सक्ती नसते. शिवाय मुद्दे कितीही विस्कळीतपणे आले तरी चालत आधीच्या

मुद्द्याचा नंतरच्या परिच्छेदाशी संबंध असलाच पाहिजे असलं निबंध-पण नसतं.

जरा नीट विचार केला तर आपल्या लक्षात येईल की आपल्या डोक्यात विचार येतात तेही विस्कळितपणे–तुटक तुटक. नाना तऱ्हांच्या बातम्यांच्या आवर्तात सापडल्यावर तर ते अधिकच. असे विचार येतील तसे शब्दबद्ध केल्यावर ते कसे असणार? तर या डायरीच्या पानावर आहेत तसे–शिवाय ते विचार, विश्लेषण कसकसे विकसत होत गेले तेही कळायला दैनंदिनीची शैली योग्य-

म्हणून ही काही पानं–

तेवीस चार ऐंशी
बुधवार
सिलचर १९–००.

दुपारी सिलचरला पोचलो. उरलेला दिवस तसा शांत. आंघोळ, जेवण रेल्वे व बसस्टेशनवर गाड्यांची चौकशी–तर सर्व काही अधिकृतपणे ठप्प. संध्याकाळी फिरून आलो. भारतीय जनता पक्षाचे जिल्हा कार्यवाह कवीन्द्र पुरकायस्था यांची भेट. जिल्हा ग्रंथालयात जाऊन मागील काही दिवसांचे पेपर पाहून आलो. कुलदीप नायरचे आसामवरचे लेख मस्त आहेत. चांगल्या पत्रकाराची समज किती भेदक (आणि दुर्मिळ) असते ते त्यावरून लक्षात येतं.

हे आसाम आंदोलन आता खऱ्या अर्थाने जनआंदोलन झालं आहे. आधीही होतंच; पण इंदिरा गांधींची अयशस्वी भेट झाल्यावर सरकार सर्व शक्तीनिशी आंदोलनावर कोसळलं. गोहाटी उच्च न्यायालयाने आपला स्टे मागे घेतला. त्यावरोबर प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा लागू झाला. निवडक भागात १४४ कलम लागू करण्यात आलं. नारिंगी येथील सत्याग्रह्यांवर लाठीमार करून त्यांना हटविण्यात आलं. संचारबंदी लागू झाली. काही भागात 'पाहता क्षणी गोळ्या घालण्याची' आज्ञा सुटली. आंदोलनात सहभागी होणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना काढून टाकण्यात येईल अशा धमक्या देण्यात आल्या. नारिंगी पंपिंग स्टेशनवरचे कामगार कामावर न आल्यास त्यांना गोळ्या घालण्यात येतील अशा अध्याहृत धमक्या मिळाल्या. बैठकीसाठी जमलेल्या नेत्यांना पकडण्यात आलं.

हे अक्षरशः सर्व आघाड्यांवरून झालेलं सर्वंकष आक्रमण होतं. अशा वेळेला आंदोलनाची सत्त्वपरीक्षा होती.

आसामी जनतेनं सर्वंकष उत्तर दिलं.

संचारबंदी मोडून लाखो लोक, स्त्रिया, बालके रस्त्यावर आली. काढून टाकण्याच्या धमकीला सरकारी अधिकाऱ्यांनी भीक घातली नाही. नारिंगीचे कामगार कामावर आले नाहीत. भीतीने काही आले, तर पंपिंग सुरू होणार तेवढ्यात हजारो लोक तिथे पोचले. लाठीमार, अश्रूधूर, रोखलेल्या बंदुका कशालाच लोक घाबरायला तयार नाहीत. तुरुंगात तरी किती जणांना टाकणार? पकडून पुन्हा सोडून देण्यात आले.

हे असं आंदोलन चालू आहे. काल रस्त्यावर आलेल्याच्या हातात गांधीजींचे फोटो आणि तोंडात वंदेमातरम्च्या घोषणा होत्या.

प्रफुल्ल महंत भूमिगत आहे.

कुलदीप नायर काही भूमीगत नेत्यांना भेटले. सरकार आणि विद्यार्थी हळूहळू जवळ येतात असं त्याच्या बातम्यावरून दिसतं. शेवटी समस्या दोघानाही सुटायला हवी आहे. व्यावहारिक कारणांसाठी विद्यार्थी–नेते १८६१ आधारवर्ष मानायला तयार आहेत, तर बाई म्हणतात की, आसामी जनतेच्या न्याय्य मागण्या मला मान्य आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न, चर्चा करायला माझी तयारी आहे.

त्याच वेळेला ईशान्य भारत आर्थिक विकास समितीने काही नव्या विकास योजना सुचविल्या आहेत. त्यात ब्रॉडगेज रेल्वेमार्ग, ब्रह्मपुत्रेवर काही ठिकाणी पूल, जलपरिवहनयोजना असे काही महत्त्वाचे प्रकल्प आहेत.

अर्थात आसामचा प्रश्न अल्पकालीन नाही. त्याला दीर्घकालीन अर्थ आहे. अखिल भारतीय स्तरावर काही महत्त्व आहे. परकी नागरिकाना हुडकून मायदेशी परत पाठविणे ही मागणी मान्य केली की विद्यार्थ्यांचं काम संपतं.

पण सरकारचं फार महत्त्वाचं काम सुरू होतं.

हे परकी नागरिक ओळखणं–ज्याची दुसरी पिढी हिंदुस्थानात आहे अशांसकट सर्वांना उचलणं–त्यात पुन्हा हिंदु–मुसलमान असा प्रश्न येणार–मुसलमानाना हात लावायलाच लागणार–आणि इथे दोन तीन प्रश्न येतात.

एक : सरकारला भारतातील मुस्लिमांची एकगठ्ठा मते गमवावी लागतील.

दोन : जे अधिक महत्त्वाचं आहे–देशात जातीय दंगलीचा उद्रेक होणे.

आसामातले घुसखोर मुसलमान तर शस्त्रसज्ज आहेत अशा बातम्या आहेत. एकदा मागणी मान्य होऊन कार्यवाहीला सुरुवात झाली की भारताच्या भूमीवर चक्क अघोषित युद्ध सुरू होणार!

समजा, घुसखोर बांगला देशीय परत पाठवायचं म्हटलं तरी त्यांना बांगला देशाने स्वीकारायला हवं. जनरल झिया तर म्हणतात बांगला देशातून एकहीजण आसामात गेलेला नाही. म्हणजे हा आंतरराष्ट्रीय प्रश्न बनतो. देशाच्या आत्ताच्या परिस्थितीत तो हाती घेणे सरकारला परवडणार आहे का? तेवढा वेळ आहे का?

आणखी एक तिढा आहे तो 'घुसखोर' आणि 'निर्वासित' याच्यासंबंधी. यावरचा एक मतप्रवाह असा की, बांगला देशातील हिंदूना भारतात यायचा पूर्ण हक्क आहे. त्याना आपण सामावून घ्यावं यावर प्रफुल्ल महंतांचं म्हणणं–त्याना सर्व प्रांतात वाटून टाका. म्हणजे पुन्हा जातीय रंग यायची भीती.

इंदिरा गांधीच्या '१९७१ पासून सुरुवात करू आणि मागे मागे जाऊ' याचा अर्थ असा असेल का? १९७१ पूर्वी आलेल्यात बहुसंख्य हिंदु आहेत. (आयुबखान राजवट आणि १९६५ चे युद्ध) तर ७१ नंतर आलेल्यात मुसलमान आहेत.

पण विद्यार्थी–नेते ही मागणी मान्य करायला तयार नाहीत. त्याना मुळी बाईंचं म्हणणं आंदोलन थांबविण्यासाठी फेकलेलं वाक्य वाटतं. एकदा का आताच आंदोलन थांबलं की पुन्हा त्याला कधी आवाज प्राप्त होईल सांगता येत नाही. Now or never ही त्याची भूमिका आहे.

–एकूण मिळून अर्थ असा की परिस्थिती एकमेकात गुंतून बसली आहे. सरकार पेचात सापडलं आहे. नजीकच असलेल्या नऊ विधानसभा निवडणूकांच्या संदर्भात तर या पेचाचं गांभीर्य आणखीनच

वाढतं. ' She can't loose nine states for one ' हे निवारण बोराचे वाक्य. त्या निवडणुका झाल्यावर बाई इकडे लक्ष देतील; पण तोवर एक आणखीनच गंभीर परिस्थिती निर्माण होतेय. संसदेच्या निवडणुका होऊन सहा महिने लोटले तरी आसामचं संसदेत प्रतिनिधित्व नाही आणि तोवर आंदोलन काय वळण घेईल कोण जाणे !

जागृत झालेल्या जनशक्तीवरचा एकदा ताबा सुटला की तिच्या गतीला, कृत्याना रोखणे कोणालाच शक्य नसत. अगदी ती शक्ती जागृत करणाऱ्यानादेखील !

आणखी एक रंग म्हणजे फुटीरतेचा !

स्वतंत्र आसाम, United States of Assam च्या कल्पना ज्याच्या डोक्यात आहेत ते या आंदोलनाबरोबर राहून त्याचा फायदा घ्यायचा प्रयत्न करणार. तसा करताना ते दिसत आहेत. त्याच म्हणणं आसाम भारताचा भाग कधीच नव्हता. इंग्रजाच्या आधिपत्याखाली तो झाला. सध्या आसामचा भारताकडून पिळवणूक होत आहे वगैरे. जनतेच्या भावना पेटवायला एवढे पुरू शकेल.

आसामी जनतेच्या कायदेशीर मागण्या मान्य न करता त्याना चिरडायचा प्रयत्न करण्याची प्रतिक्रिया कदाचित अशी उमटेल की, मग आम्हाला भारतात रहाणच नको. आताही बडखोर वाक्ये क्वचित क्वचितच कानावर येतात; पण उद्या त्याच्या पाठीशी लाखोचा आवाज उभा राहिला तर तो दडपण अशक्य होईल. आसाम तर भारतविरोधी कारवाया जेथे चालतात अशा राज्यानी घेरलेला आहे. भारतापासून फुटून निघण्याच्या मागणीला जिथे स्पष्ट आवाज आहे, ज्या आवाजाच्या पाठीशी बंदूक आहे, चिनी शिकवण आहे, अमेरिकन पैसा आहे, अनेक आतरराष्ट्रीय शक्ती भारताच्या एकतेशी खेळ करू पहातात त्यांच्या कारवायानी जो भाग भरलेला आहे हे आता निर्विवाद आहे, असा भूभाग आसामभोवती आहे. सरकारकडून दारुण अपेक्षाभग झालेल्या उत्स्फूर्त जनशक्तीला फुटीर वळण लावणं अशा परिस्थितीत फारसं अवघड नाही.

म्हणजे ' India is to be in greater distress ' हेच खरं दिसत. अर्थात एक निश्चित—आता तरी हे आंदोलन राष्ट्रवादी आहे, फुटीर नाही.

इतिहासाचा दाखला घेऊ या.

भारताच्या सर्व प्रातामध्ये आसाम हा एकमेव प्रांत असा आहे की, जो कधीही मुस्लीम सत्तेकडून जिंकला गेला नाही. मुघलाचा आसामी सेनापतीनी सतरा वेळेला पराभव केला. हे करणारा आसामी शिवाजी म्हणजे लचित बदफुकन. बदफुकन म्हणजे सेनापती. मुघल सकट आपल्यावर येणार हे आधीच ओळखून ' अहीम ' सम्राटानी युद्धाची तयारी केली होती. आपले काचारी राजाशी असलेले वैर मिटवून टाकल. परकी सकट ओळखून आपसातलं भाडण सपवण्याची भारताच्या इतिहासात दुर्मिळ असणारी वृत्ती आसामी इतिहासात दिसते. १८५७च्या स्वातत्र्यसमरापासून स्वातत्र्यचळवळीत आसामचा सहभाग आहे. पुढाकार आहे.

सगळ्यात लक्षणीय गोष्ट म्हणजे स्वातंत्र्य मिळताना काँग्रेसी नेत्यानी आसाम पाकिस्तानात असणं मान्य केलं होतं. तेव्हा आसामी जनतेनेच आपणहून 'आम्ही भारतीय आहोत ' हा झगडा केला. महात्मा गांधीजीनी या झगड्याला यश मिळवून दिलं. फाळणीला महात्माजी जबाबदार आहेत असं म्हणणारांना बहुधा हे माहीत नसावं.

वरील सर्व ऐतिहासिक-सास्कृतिक धागे तोडून आसामी स्वतंत्रतेचे घोडं नाचवू लागले तर आंदोलनाचे नेते घोडचूक करतायत असं म्हणाव लागेल.

या आंदोलनाबद्दल इतकी उलटसुलट मते व्यक्त केली गेली आहेत की त्यातून एक निष्कर्ष काढणे कठीण आहे. निष्कर्ष काढायला आधार म्हणजे जे स्वत.च्या डोळ्यानी पाहिले त्याचा विविध मताशी मेळ घालणे.

एक आरोप : हे आंदोलन बंगालीविरोधी आहे. असमियांच्या मनात बंगाल्याबद्दल राग आहे हे सरळ आहे. हा राग बंगाल्याच्या आसाममधील वर्चस्वावर आहे. त्यावर बंगाल्याच म्हणणं असमियाच आळशी, कमी बुद्धीचा आहे. हे जरी खरं मानल तरी या आंदोलनामुळे असमियाला जर स्वत्वाची जाणीव येत असेल तर काय हरकत आहे ? कदाचित त्यातून साखळलेली आसामी प्रतिभा मुक्त होऊ शकेल.

मुस्लीमविरोधी आंदोलन करणाराची भूमिका मुस्लीम विरोधी दिसत नाही. आसाममध्ये आजपर्यंत हिंदु—मुसलमान दंगली झालेल्या नाहीत. आता जे घुसखोर आहेत, आपली पॉकेटस् बनवून बसलेत, वेळ आली तर आसामवर घाव घालण्याची ज्यांची तयारी आहे त्यातले बहुसख्य मुसलमान आहेत ही काही आंदोलनकर्त्यांची चूक नाही.

## विघटनवादाचा बागुलबुवा

भारतविरोधी हा आरोप तर मनातली केवळ एक भीती दाखवतो. या आंदोलनात छुपे भारतविरोधी घटक आहेत यात शकाच नाही. आंदोलनाच्या प्रवाहाबरोबर राहून त्याला फुटीर वळण द्यायचा ते प्रयत्न करतायत हेही दिसत; पण या शक्ती अजून जोरात नाहीत. आंदोलनाच्या पृष्ठभागावर आलेल्या नाहीत. जनआंदोलन म्हणून ते फुटीर नाही. चहावाला, हातगाडीवाला, हॉटेलातला वेटर, गॅझेटेड ऑफिसर, वृत्तपत्रसपादक, विद्यार्थी, स्त्रिया, अगदी बंगाली मुस्लिम याच्याशी आम्ही बोललो. ही माणस राजकारणी बोलत नाहीत, त्याना जे म्हणायच असत ते ते स्पष्टपणे सांगतात. या सर्वांनी आम्हाला अभिमानानं सांगितलं आहे, ' आम्ही भारतीय आहोत. भारताबरोबरच आहोत. फक्त आसामच्या विकासाची, सास्कृतिक रक्षणाची मागणी मान्य व्हावी एवढच !' आपल्या आंदोलनाला ' विघटनवादी ' म्हणतात याची तडफड त्याच्या चेहऱ्यावर दिसायची. ते आम्हाला बजावून सांगायचे की तसं हे नाही हे तुमच्या लोकाना सागा ! आसाम आंदोलनाची माहिती घ्यायला आलो आहोत म्हटल्यावर लोकाचा पहिला प्रश्न असायचा— मग हे आंदोलन तुम्हाला फुटीर वाटलं का ?

हे एक चित्र समोर मांडून पाहू.

सत्याग्रहीच्या हातात, छातीवर गांधीजी असतात. गांधीजीचं नाव घेऊन चाललेलं शांततापूर्ण आंदोलन फुटीर कसं असेल ? पण या भावनिक समाधानाला काही अर्थ नाही. इथे गांधीजींचं नाव घेऊन नदीचे घाट धुण्यापासून ते सत्ता काबीज करण्यापर्यंत (कोटी

कोटी रु खर्च करून चित्रपट काढण्यापर्यंत) सर्व प्रकार चालतात !

तरीही राष्ट्रपित्याचं नाव घेऊन देशाला फसवायला असमियाना काही कुठली निवडणूक जिंकायची नाही ! त्यांच्या तोंडातले 'वंदे मातरम्' प्रामाणिक मानायला हरकत नाही

त्यामुळं उद्या समजा प्रफुल्ल महंत, भ्रिगुफुकन, भरत नारा किंवा जतीन गोस्वामी जरी म्हणाले की आसाम स्वतंत्र होऊ इच्छितो, तरी जनतेची नाडी ओळखण्यात ते चुकतायत असं म्हणावं लागेल. या अर्थानं हे नेते आंदोलन निर्माण करणारे नेते नसून उत्स्फूर्तपणे निर्माण झालेल्या आंदोलनाचे प्रतिनिधी आहेत. (नेते हे जनतेचे प्रतिनिधी असतात हे आपण सर्वांत मोठ्या लोकशाही राष्ट्रात राहून विसरतो आहोत.)

मूलत एवढ्या प्रचंड जागृत जनशक्तीचं विराट दर्शन पाहिल्यावर समाजाचा एक घटक मनातून धावरत असतो तो आपल्या परीने आंदोलन बदनाम करायचा प्रयत्न करतो. हितसंबंधी पत्रकार, राजकारणी याचा वर्ग याचा फायदा घेऊन जनतेचं मन द्विधा करू शकतात. इथे ग्यानबाची मेख आहे. आजपर्यंत तरी आंदोलनाच्या अध्वर्यूंनी ते राजकारणातीत ठेवलं आहे; पण प्रत्येक गोष्टीला राजकीय, पक्षीय रंग द्यायची सवय असलेला एक धंदेवाईक गट धुरळा उडवून जनतेच्या मनात गोंधळ माजवायचा प्रयत्न करतो. संभ्रमात असलेली जनता म्हणजे त्यांच्या यशाची निश्चिती.

## आर्थिक विकास व सांस्कृतिक बंधुत्व हवं

हे आंदोलन कोणाच्याही विरोधात नाही ते आसामच्या बाजूने आहे. बंगाली वर्चस्व आणि घुसखोर हे आसामचे महत्त्वाचे प्रश्न आहेत. 'जय आसाम आई' फुटीर वाटण्याचं कारण नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत 'जय महाराष्ट्र' हा स्फूर्तीचा शब्द होताच ना ! क्वचित बंगाल्यांवर झालेल्या हल्ल्यांनी संपूर्ण आंदोलनाला बंगालीविरोधी समजायचं कारण नाही. महाराष्ट्रात मराठी प्रेमाचं वादळ आलं होतं तेव्हा दक्षिण भारतीयाना काही प्रमाणात त्रास झाला होताच. काळ जातो तसतसे हे रंग धूसर होत जातात.

आसामचा हा प्रश्न दडपून सुटणार नाही. काही जुजबी मलमपट्टी करूनही भागणार नाही. आसामच्या आर्थिक विकासात याचं एक उत्तर आहे. हिरवागार, सुजल, सुफल आसाम विविध योजना करून नंदनवन करता आला तर 'आम्ही दुर्लक्षित आहोत' हे असमियाच्य मनातलं दुःख दूर होईल. भारताच्या इतर भूमीशी आसामचे सांस्कृतिक धागे व्हायला हवेत. आता असमियाला सारखं वाटत असतं की आपण या मधल्या पन्नास मैलाच्या अरुंद धाग्याने भारताच्या मुख्य भूमीशी कसेबसे जोडलेले आहोत. कोणीही त्यावर घाव घातला की आपण भारतापासून तुटू त्याला असंही वाटत असतं की तसे आपण तुटलो तरी भारताला चालेल. कारण आपल्याकडे भारताची एक वसाहत म्हणून पाहिलं जातं अशी त्याची भावना आहे. १९६२ च्या भारत–चीन युद्धात चिनी सैन्य तेजपूरपर्यंत आल्यावर नेहरू म्हणाले होते. My heart goes with the people of Assam हे वाक्य असमियाच्या मनात अजून सलतं त्या चिनी सैन्याने आमच्या स्त्रियाना हात लावला नाही, पण काल–परवा कायदा व सुव्यवस्था राखायला शिरलेल्या भारतीय सैन्याने आमच्या आया–बहिणीवर बलात्कार केले हे सांगताना त्याला क्षोभ आवरत नाही, उद्या हीच गोष्ट प्रक्षोभक वळण घेऊ शकते.

आसामच मुख्य दुःख हे आहे.

राजकीय रंग देऊन किंवा तात्पुरती मलमपट्टी करून ते दूर कसं होईल ? आर्थिक विकास आणि सांस्कृतिक बंधुत्व हेच याचं उत्तर आहे. केवळ सत्तेची लालूच असणाराना याचा अर्थ कळेल अशी अपेक्षा नाही; पण तुम्हाला–आम्हाला कळायला काय हरकत आहे ? ¤

सत्तावीस चार ऐंशी

रविवार – १२ ००.

गोहाटी.

आसाम पूर्णपणे बंद दोन ठिकाणी गाड्या बदलत, वाट वाकडी करत कसेबसे गोहाटीत पोचलो कालचा प्रवास तर अक्षरशः रेल्वेच्या गँगवेवर उभं राहून केला.

आंदोलन विजयोन्मादी मूडमध्ये आहे सर्व सरकारी धमक्यांचा पार पाचोळा उडवून दिला आहे आठ–दहा महिने हा लढा अभेद्य एकीने चालू आहे काही अपवाद वगळता हिंसक प्रकारही शून्यवत आहेत. ते झाले असते तर लष्कराचा वापर करून आंदोलन चिरडता आलं असतं असं म्हणतात. ते शांतिपूर्वक चालल्याने आंदोलन चिरडण्याचा नैतिक अधिकार सरकारला नाही.

आंदोलन–नेत्यांच्या स्वरात किंचित मगरूरी आली आहे की काय, असं वाटतं, Assam Tribune मधून येणाऱ्या बातम्या, नेत्यांची विधानं, आवाहनं यात हा सूर जाणवतो. असं असेल तर ते घसरायला सुरुवात झाली असं समजावं.

इंदिरा गांधी विधानसभा निवडणुकानंतर आंदोलनाचा समाचार घेणार असं म्हणतात, हरिश्चंद्र सरीनची 'आसाम सरकारचा विशेष सल्लागार' म्हणून नेमणूक होणं ही अर्थपूर्ण घटना आहे. सरिन हा इंदिरा गांधींचा आंदोलन हाताळणे तज्ज्ञ. तेलगण आंदोलन हाताळणारा हाच. गुजराथमधील नवनिर्माण आंदोलनाचे तुकडे करणारा हाच हरिश्चंद्र बिहारमधील जयप्रकाशजींच्या आंदोलनाच्या वेळी हरिश्चंद्र सरीन बिहार सरकारचा सल्लागार होता. फोटोवरून तो स्मार्ट, कार्यक्षम अधिकारी वाटतो.

गणसंग्राम परिषदेने सरकारला १० मेची अंतिम मुदत घालून दिली आहे. त्यानंतर आम्हीच विदेशी नागरिक शोधून परत पाठवायला सुरुवात करू अशी त्यांची धमकी आहे. इथून पुढचा आंदोलनाचा कार्यक्रमही याच दिशेने आखला आहे. २८ एप्रिल असहकारदिन. त्याचा प्रचार आज 'आसु'चे कार्यकर्ते सायकलवरून फिरून करणार. २९ ३० एप्रिलला ते खेडोपाडी जाऊन आंदोलनाची सद्यस्थिती आणि जनतेची भूमिका प्रत्येक सामान्य माणसाला समजावून सांगणार– १ व २ मे हे शांतिदिन आणि त्यानंतर अंतिम मुदतीपूर्वीचा शेवटचा टप्पा.

अतिशय कल्पकतेनं संघटित केलेलं आहे हे आंदोलन. जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद आहेच; पण हा प्रतिसाद योग्य तऱ्हेने मार्गी लावण्यात, टिकवून धरण्यात नेतृत्वाची कसोटी असते. या आंदोलनाच्या नेतृत्वाने हे यशस्वीपणे करून दाखवलं आहे प्रत्यक्ष गांधीजींचं

आंदोलनही इतक्या शिस्तबद्धपणे इतका काळ चाललं नाही, 'ब्रेन' कोण ते शोधायला हव.

काही चुकणाऱ्या पाली !

सी. आय ए च्या हातासंबंधी. फुटीरतेसंबंधी.

## ईशान्य अभेद्य हवी

श्रीमती निरुपमा बारगोहाईन या प्रसिद्ध आसामी लेखिकेने हा मुद्दा बऱ्याच चागल्या पद्धतीने सागितला, या सी. पी. एम ला अनुकूल असलेल्या बाई त्याना या काळात बरेच कष्ट,मानहानी सोसावी लागली. त्यानी अनेक अर्थपूर्ण घटना सागितल्या. थायलड हा अमेरिकेचा आग्नेय आशियातला शेवटचा तळ. थाईचा आणि आसामचा सबंध वाढत आहे गेल्या वर्षाच्या बारडोलाई कप फूटबॉल टूर्नामेंटस्साठी थायलंडची टीम पहिल्यादा आली होती बंगालच्या टीमपेक्षा त्याना प्रेक्षकाच प्रोत्साहन जास्त होतं गेल्या वर्षाचा लिहू हा आसामी सण ईशान्येतल्या सात राज्यानी मिळून साजरा केला. शिलाँगमध्ये झालेल्या हिंसक कारवायाबद्दल एका मिशनऱ्याला धरले आहे. इतका काळ चाललेल्या आदोलनाला पैसा मिळतो कुठून ? निवारण वोरा, एल. पी. सिंग (तेव्हाचे राज्यपाल) परमशिवन (तेव्हाचे राज्यसरकारचे सचिव) हे CIA च्या पे-रोलवर आहेत असे म्हणतात. मोठा खप असलेल्या साप्ताहिक 'नीलाचल'चा सपादकही. यानी लाखो रुपयाच्या देणग्या आदोलनाला दिल्या आहेत.

आणि काही वेगळे विचार–

एक : इंदिराबाईंचे ईशान्य भारताकडे बारीक लक्ष दिसते आहे लालडेंगावरील आरोप काढून टाकून मिझो–प्रश्न सोडविण्याच्या दिशेने पावलं उचलणं, नागा–नेत्याशी बोलणी, मणिपुरी भाषेला भारताची राज्यभाषा म्हणून मान्यता देणे वगैरे Nobody needs to teach me about national integrity हा त्याचा मगरूर आत्मविश्वास आहेच.

दुसरा : अरुणाचल प्रदेश हे भारताचं ईशान्य सीमेवरील आशास्थान आहे अस दिसतं मुख्यमत्री श्री. गेगाग अपाग. धर्मस्वातत्र्य विधेयक पास करणार हे राज्य. आतापर्यंत येथील शिक्षणसस्था 'NEHU' ( North East Hills University, शिलाँग) शी संलग्न होत्या. नेहुवर फुटीर ख्रिश्चन गटाचं प्रभुत्व आहे अरुणाचलने आधी या विद्यापीठाशी सबंध तोडून स्वत ला गोहाटी विद्यापीठाशी सलग्न करून घेतल. यदा त्याच्या परीक्षा नाहीत म्हटल्यावर त्यानी पंजाब विश्वविद्यालयाला आपल्या परीक्षा घेण्याची विनती केली. पंजाबने ती मान्य केली. आता अरुणाचल स्वत चं विद्यापीठ स्थापायचा विचार करत आहे. परकी घुसखोराचा प्रश्न तर सरकार आणि विद्यार्थी यानी मिळून फटक्यात सोडवून टाकला ओळखपत्र वगैरे देऊन.

अरुणाचलच नाही, सर्व ईशान्य भारताच्या दृष्टीने महत्त्वाची आहे बागलादेश, ब्रह्मदेश, चीन याना त्याची सीमा भिडते. या भागातल्या टेकड्या ही भारताची अभेद्य सरक्षणफळी बनायला हवी. नेमका हाच भाग फुटीर बनला आहे.त्या दृष्टीने North East council ची कल्पना चागली आहे

१९७९ चं 'ज्ञानपीठ' पारीतोषक आसामी भाषेला मिळालं श्री विरेन्द्रकुमार भट्टाचार्यजी 'मृत्युजय' कादंबरी सुभाषबाबुंच्या ब्रह्मदेशमधील लढ्याच्या पार्श्वभूमीवरील ही कथा आहे असं पेपरात वाचलं

नजीकच्या भविष्यकाळात तरी आदोलनापुढे प्रश्नचिन्ह–डेडलॉक–दिसतो आहे प्रश्न कसा सुटणार, किती काळात सुटणार याचा काहीही अंदाज येत नाहीये दीर्घ काळाचा विचार करता आसाममध्ये आर्थिक विकासाचे कार्यक्रम हाती घेतले जायला हवेत. दळणवळणसपर्काची साधने जास्ती प्रमाणावर यायला हवीत उर्वरित भारताशी सबंध ज्यामुळे पक्का होईल अशा आर्थिक, सास्कृतिक योजना राबवायला हव्या.

आसामची सुप्त शक्ती खूप मोठी आहे तेल आणि चहा यात तर आसाम आजही अग्रेसर आहे मोठी जगलं ही एक संपत्ती. ब्रम्हपुत्रेच्या पाण्याचा उत्कृष्ण जलविद्युतनिर्मितीसाठी वापर करता येईल अस मत पाश्चात्य तज्ज्ञानी व्यक्त केलं आहे रस्ते, रेल्वे, ब्रह्मपुत्रेवर पूल याचं वस्त्र विणून आसाम भारताशी जोडून टाकायला हवा. कागदउत्पादनाला आसाम हे योग्य ठिकाण आहे नॉर्थईस्ट कौन्सिलने यातल्या काही योजना सुचवल्या आहेत. सहाव्या पंचवार्षिक योजनेत त्याचा अतर्भाव होत आहे ही आनदाची गोष्ट आहे. शिवाय रेडियो-दळणवळण सुधारणे, चित्रवाणीकेन्द्र स्थापन करणे या सूचना त्यात आहेत.

## स्वावलंबी विकास योजना–आसामची गरज

ईशान्येतले संघ–कार्यकर्ते जागरूक वाटले ईशान्य भारताची अवस्था नाजूक आहे, राष्ट्रीय एकात्मतेसाठी आपल्याला या भागात महत्त्वाची भूमिका बजावायची आहे याची जाणीव त्याना आहे. ही भूमिका बजावण्याची त्यासाठी पडलेली किंमत देण्याची त्याची तयारी आहे. जिथे सघस्वयसेवकाच्या भेटी झाल्या तिथे त्याचे विचार ऐकून, टीमवर्क पाहून, नियमितपणे बातम्या ऐकून त्यावर त्यानी सगळीकडे चर्चा करताना पाहून हे मत बनल.

बाकी– सकाळी उठला–अघोळ–मलबार होटेलात जड न्याहारी ! (हेवी ब्रेकफास्ट) –कपडे धुणे–जेवण–झोप–सध्याकाळी गावातून एक चक्कर–एक दोन किरकोळ भेटी–खाणे–जेवण आता झोपायचे !

'आसामबाहेर जाऊन आसामची बाजू समजावून सागा' या आमच्या सूचनेला प्रतिसाद का नाही कळत नाही.

या आदोलनाच्या निमित्ताने असमिया माणसाने स्वत च्या सामाजिक उणीवाकडेही लक्ष द्यायला हव. सर्वच गोष्टीसाठी केन्द्र सरकारला दोषी धरून चालणार नाही. तीस वर्ष आसाममध्ये राज्यसरकार होतच ना ? ससदसदस्य काय करीत होते ? काही वेळी आसाममध्ये विकासयोजनावर खर्च करायला दिला गेलेला पैसा तसाच्या तसा पडून राहिला आहे (न खाता ? आश्चर्य ! काय हा आळशीपणा ! )

सरकारच फक्त विकास घडवत हा गैरसमज आहे (प्रसगी'च' आणि 'फक्त' काढून टाकल तरी चालेल) महाराष्ट्र, पजाब, तामिळनाडू, गुजराथ येथील विकास काही फक्त सरकारी योजनामुळे झालला नाही. खाजगी व्यापारी, उद्योगपती, कष्टकरी, विचारवत याचा वाटाहो महत्त्वाचा आहे. आसाममध्ये अशी प्रतिमा निर्माण व्हायला हवी.

आमच्याकडे दुर्लक्ष होत आहे,

आर्थिक दृष्टया आम्ही मागासलेले आहोत.

केवळ पिळवणूक करण्यासाठी आमचा वापर केला जातो.

आमच्याकडून जेवढ घेतलं जात त्या प्रमाणात दिलं जात नाही.

अशी ओरड सर्वच प्रांत आलटूनपालटून करत असतात. बंगालचे बसु सारखं हेच म्हणतात. अधूनमधून महाराष्ट्रही, उत्तरप्रदेश बिहार तर मागासलेले आहेतच.

खरं तर विकास कमी आहे, तो अजून व्हायला हवा' हे संपूर्ण देशाच्या बाबतीत खरं आहे. एखाद्या प्रांताने स्वत.पुरतचं पहायचं आणि दुसरा प्रांत जास्त विकसित आहे असं बोट दाखवायच हा संकुचित दृष्टीकोण आहे. आणि एवढ्यावरून भारतापासून फुटून निघायची भाषा काढणं हा तर फांदीवर बसून घाव घालण्यचा प्रकार आहे.

'व्हाय शुड वी बी विथ इंडिया' या वाक्याला काय अर्थ? म्हणजे जणू काही 'इंडिया' नावाची एक संस्था आहे, आर्थिक फायद्यासाठी आसामनं तिच सदस्यत्व स्वीकारलं आहे आणि असे फायदे होत नसतील तर वार्षिक वर्गणी भरणं बंद करून आसाम आपलं सदस्यत्व काढून घेणार असं थोडच आहे. 'आसाम' म्हणजे 'भारत'– भारताचा एकसंघ भाग –

आणखी एक प्रमेय–

नागालॅण्ड, मणिपूर, मिझोराम याची व्यक्त किंवा अव्यक्त स्वरूपात स्वतंत्र राष्ट्राची मागणी आहेच. हा सर्व टेकड्याचा प्रदेश. आर्थिक साधने, लोकसंख्याही कमी. अनेक राष्ट्रानी घेरलेला, त्याचं एक टिकाऊ 'राष्ट्र' घडूच शकत नाही.

मग टिकाऊ, योग्य आकाराचे स्वतंत्र राष्ट्र केव्हा बनेल?

अधिक भूमी, अधिक लोकसंख्या आणि अधिक आर्थिक साधने हाती आली तर–

ही केव्हा येतील?

आसाम या स्वतंत्रतेच्या कल्पनेबरोबर आले तर–

हे तर्कशास्त्र जर मला कळत तर हा भाग भारतापासून फोडण्याचा प्रयत्न करणारांना कळत नसेल काय? निश्चितच. नाही तर U. S. A. Publicity Dept. (east) ने प्रसिद्ध पत्रके केलेली काय सिद्ध करतात?

□

अठ्ठावीस एप्रिल ऐंशी
सोमवार
गोहाटी–२२.००

आसाम आंदोलनाचा हा आत्ताचा काळच असा आहे की इथे घडणाऱ्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीला महत्त्व आहे. वृत्तपत्रात येणाऱ्या बातमीला विशेष अर्थ आहे. आंदोलनाच्या बाजूने आणि विरुद्ध अशा दोन्हीला आधार देतील अशा तऱ्हेच्या इतक्या बातम्या येत असतात की आपण गोंधळून जावे. आंदोलन राष्ट्रवादी आहे की फुटीर, आसाम-विकासासाठी की बंगाली विरोधी, भारताच्या एकतेला हातभार लावणार आहे की परकी शक्तीची मदत घेऊन सुरुंग लावणारं आहे या द्विधा विचारात सापडून गेल्यासारखं होतं. आंदोलनाचा अभ्यास करताना सुरुवातीला काही काळ माझीही हीच अवस्था झाली होती.

आंदोलनासंबंधीच्या विविध मताच्या टोकावर झोके घेत होतो. जेथे जाईन तेथे जे पाहिलं, लोक जे बोलले त्याच्या व्यापक चौकटीत अर्थ लावायचा प्रयत्न करत होतो. हे करण्यात पहिल्यादा गोंधळून गेल्यासारखं व्हायचं. हेही खरं तेही खरं असं वाटायचे.

आता एकूण अर्थ लागतो आहे.

राष्ट्रवादी, आसामविकासासाठी आणि एकतेला हातभार लावणारे या आंदोलनाचे (तूर्त तरी) गुणधर्म आहेत. आजच 'आसाम–ट्रिब्यून' मध्ये 'आसु' चं राष्ट्रीय एकता जपण्याचे आवाहन आलं आहे. आसुने ही भाषा इतक्या स्पष्टपणे प्रथमच काढली आहे. 'फुटीरापासून सावध, विदेशी हातापासून सावध' हेही त्यानी सांगितले आहे. अर्थात त्याबरोबरच आंदोलनात फुटीर, बंगाली द्वेषी, राष्ट्रद्रोही घटक आहेत हे खरं आहे.

म्हणून 'आसु' नेच ही सावधगिरीची सूचना दिली हे बरं झालं. श्री. विरेंद्रकुमार भट्टाचार्यजीना ज्ञानपीठपारितोषिक मिळाल्याचा आनंदही आसामी माणसाला झाला आहे. आसामी साहित्याची राष्ट्रीय स्तरावर कदर केली गेली आहे याचे समाधान आहे.

बाकी आजचा कामाचा शेवटचा दिवस दौऱ्यांचा क्लायमॅक्स मानायला हरकत नाही. सकाळी दहापर्यंत आवराआवर, आराम, पत्रापत्री वगैरे.

## खऱ्या अर्थानं जनआंदोलन

त्यानंतर जमाते इस्लामच्या कार्यालयात गेलो. सिलचरमध्ये कळलं होतं की गुलाम उस्मान आणि अल्ताफ हुसेन हे दोन आमदार गोहाटीत आहेत. त्याची चौकशी करायला गेलो

तिथच साप्ताहिक 'मुजाहिद' चे संपादक श्री. मोहम्मद करामत अली याची भेट झाली. आंदोलनातील त्याची बाजू ऐकायला आलो आहोत याचा त्याना आनंद झाला. त्यानी 'मुस्लीम' बाजू मांडली. फारसे घुसखोर नाहीतच, विदेशीच्या नावाखाली मुसलमानाना हुसकून लावण्याचा डाव आहे हे त्याचे मुद्दे. गमत म्हणजे बांगला देशातल्या हिंदूना भारतात यायचा हक्क आहे. कारण बांगला देश इस्लामिक राष्ट्र आहे, हा मुद्दा त्याना मांडला.

दुसरे भेटले गोहाटी हायकार्टातील अॅड. अखया रुद्दीन लष्कर. 'मी प्रथम बंगाली, नंतर मुस्लीम' हे त्याचे प्रास्ताविक वाक्य ऐकून उडालोच. मग त्यानी बंगाली बाजू मांडला. आंदोलन अँटी बंगाली आहे, विघटन वादी आहे वगैरे.

तोवर ११ वाजलेच होते. 'युद्ध निनादा'ची मिरवणूक सुरू झालीच होती. हजारो लोक, लहान मुलं-मुली, युवक-युवती, प्रौढ माणसं, झाडून सारे त्या मिरवणुकीत होते. सगळ्या रस्त्यावर रांगा करून उभे होते आणि बेलबाग चौकातून क्रमाने गणपती सोडणाऱ्या इन्स्पेक्टरसारखे 'आसु'चे कार्यकर्ते दोन दोन रांगाना शिस्तीत सोडत होते. लोक ढोल, डफडी, पिपाण्या, टाटवाट्या, शंख अशी सर्व तऱ्हाची साधने घेऊन 'युद्धनिनाद' काढत होते. ज्याच्याजवळ काहीच नव्हत ते तोंडाने शंखनाद करीत होते. युवक–युवती चालल्या होत्या पण कुठेही थिल्लरपणा दिसत नव्हता. नाहीतर या आवाजात जे वातावरण निर्माण होतं त्यात असल्या गोष्टीना प्रोत्साहन मिळणं शक्य होतं.

रस्त्याच्या एका बाजूने मिरवणूक जात असताना दुसऱ्या बाजूने

वाहतूक चालू होती. इतर आदोलनात मोटारी जळाल्या असत्या, काचा फुटल्या असत्या, १०।१२ जणानी मार खाल्ला असता. या आदोलनाच्या शांत, शिस्तबद्ध रूपाचं कौतुकच करायला हवं.

लोक तर अक्षरश: सर्वस्व पणाला लावून उतरले आहेत. असमिया समाजाचा कुठलाही थर या आदोलनापासून अलिप्त दिसत नाही. उत्साह तर ओसडून वाहत असतो. लोकाच्या चेहऱ्यावर जिगर, आवेश दिसत असतो नेतृत्वही कल्पकतेने लोकाना विविध तऱ्हेचे कार्यक्रम देत असतं. आदोलनाची लयच अशी आहे की 'आसु'ने कार्यक्रम जाहीर करायचा अवकाश, जनतेने तो उचललाच म्हणून समजा ! आजच्या असहकारदिनाचं तेच. सबकुछ बंद. अगदी रेल्वे, तार सर्व काही. स्वतंत्र भारतात कुठलंही आदोलन इतकं सर्वंकष झालेलं नाही.

## सत्ताबदलाची नांदी

या आदोलनाचं नेतृत्व राजकारणातीत व्यक्तींच्या हातांत आहे. आजपर्यंत तरी ते संकुचित राजकीय धुळवडीपासून दूर आहे. आदोलनाची मुख्य सूत्रे विद्यार्थीवर्गाच्या हातात आहेत.

स्वतंत्र भारतातील आदोलनाचं हे एक वैशिष्टच आहे नेतृत्व विद्यार्थ्यांच्या हातात कसं ? विद्यार्थीवर्ग एवढा प्रभावी का ?

कुठल्याही विकसनशील देशात विद्यार्थीवर्गाला महत्त्व प्राप्त होणं क्रमप्राप्त. आहे कारण खऱ्या अर्थाने देशाचा विकास त्याच्याशी संबधित असतो. देशातील अज्ञान, सुशिक्षित बेकारी आणि युवापिढीतील संभ्रम, नैराश्य हे देशाचे प्रश्न. शिवाय ज्या देशात साक्षरतेचं प्रमाण कमी आहे त्या देशात शिकलेल्या म्हणजे विद्यार्थीवर्गावर नेतृत्वाची जबाबदारी निसर्गत च येते. गुजराथमधील नवनिर्माण आदोलन, बिहार आदोलन आणि ताजे आसाम आदोलनं यातून हे कळतेय की युवक ही जबाबदारी समजतोय. ही तीनही आदोलने या दशकातली स्वातंत्र्य मिळाल्यापासून पंचवीस वर्षे लोटल्यावर ज्याना गती आली अशी आदोलन. त्याचा एक अर्थ असाही होतो की स्वातंत्र्यात जन्मलेली पिढी आता देशाची सूत्रे आपल्या हातात घेण्यास सज्ज आहे या 'सत्ताबदला'च्या प्रक्रियेत सघर्ष अटळ आहे विशेषत. ज्याच्या हातून ही सूत्रे घ्यायची ते भ्रष्ट, सत्तालोलुप, नीती-अनितींचा विवेक फारसा न बाळगणारे असतील तर सघर्ष जास्तच तीव्र आणि संघर्ष कितीही तीव्र झाला तरी इतिहासाच्या नियमानुसार युवकाचा विजय अटळ एकच धोका आहे. तो म्हणजे राजकारणात शिरून युवकनेतृत्वच भ्रष्ट होण्याचा. भ्रष्ट राजकारणाने वाट लावलेल्या तरुण-तुर्कांची उदाहरणे काही कमी नाहीत !

एकोणतीस एप्रिल ऐशी मंगळवार.
गोहाटी रेल्वेस्थानक– १२–१५

दौरा संपला.

स्थानकावरच्या कँटिनमध्ये बसून लिहितो आहे

शेवटचे काही तासही तितकेच महत्त्वाचे, कामाचे गेले. अभ्यास, भेटी व्यापक प्रमाणावर झाल्या आहेत; पण संपूर्ण आदोलन एका अनिश्चित रंगात आहे. पुढे काय ?

सकाळी युनियन हॉलवर जाऊन 'आसु'च्या मित्राचा निरोप घेतला. निघता निघता लक्षात आल की एवढ्या दिवसात ते आपले मित्रच बनून गेलेत. युनियन हॉलसमोरच्या धादलीच्या चित्रातले आम्हीही एक घटक होऊन राहिलो होतो. मुख्य नेते तर सगळे तुरुंगात किंवा भूमिगत आहेत. कार्यालयात अबु नासर निलीन, ललित राजखोवा भेटले. Do come back हा त्याचा निरोप.

त्यानंतर 'दैनिक आसाम'च्या संपादकांची भेट. श्री. कीर्तिनाथ हजारिका. वृद्ध, गोरा माणूस. चेहऱ्यावर सुरकुत्या आहेत. खास असमियाप्रमाणे मृदु बोलणं. आक्रमकता, अभिनिवेश नाही; पण ठामपणा आहे. ते म्हणाले, 'Assam is going to be in blood.'

सरकार कठोर उपाय घेत रहाणार असं दिसतंय. काही विचित्र, हिंसक गोष्टी घडणं शक्य आहे. 'आमसु' (ऑल आसाम मायनॉरिटी स्टुडंटस् युनियन नुकतीच स्थापना) ने प्रतिआदोलन उभं करण्याची हाक दिली आहे. पाच मेपासून मुस्लिम व बगाली आदोलन सुरू करत आहेत. आसाम–आदोलनाच्या नेत्यानी सरकारला १५ मे ही अतिम मुदत दिली आहे.

आदोलनाला हिंसक वळण लागत नाही म्हणून सरकार कोंडीत सापडलं आहे. श्री. खन्ना (हिंदुस्थान टाइम्स) सांगत होते की हरिश्चंद्र सरीन म्हणाले I can't do anything इथे हिंसकता नाही, नेत्यामध्ये दुही नाही. मी करू काय ?

खोटया बातम्या मात्र दिल्या जातायत. वाघिणी लुटल्याच्या, बंगाल्याचे खून होत असल्याच्या, बॉंब सापडल्याच्या तेल, रॉकेलटंचाई निर्माण झाली आहे, पाण्याचाही खडखडाट अन् दोन–तीन महिन्यात या ब्रह्मपुत्रेला पाणी इतके होईल की त्यात आंदोलन बुडून जाईल. कशाही परिस्थितीत लोक सत्याग्रहाला बाहेर पडतात. आज सकाळी तासभरच पाणी येणार होत. तर सार्वजनिक नळापाशी राग करून लोक उभे होते. प्रत्येक जण फक्त एक तपेलेभर पाणी घेत होता. भाडण नाही, आरडाओरडा, गोंधळ, साडलवंड काही नाही. निरोप घेताना श्री. हजारिका पाठीवर हात ठेवत म्हटले, 'जा जाऊन साग की आम्ही या राष्ट्रासाठी मरायला तयार आहोत.'

आतून आर्मीची तयारी चालू असल्याच्या बातम्या आहेत वृत्तपत्राना कागद मिळत नाही. पी.टी आय्, यू एन् आय्, समाचार याचे फोन, टेलिप्रिंटर्स नियमितपणे काम करत नाही, फोन्स तुटतायत. रेडियोवरून बहकावणाऱ्या बातम्या दिल्या जात आहेत काय वाटेल ते करून आदोलनाची शांती विघडवायची आणि मग ते चिरडायचं असा डाव आहे असं अनेक जण सागत होते.

या क्षणाला आसाममधून बाहेर पडून नेत्यानी देशभरचे लोकमत, वृत्तपत्रे या प्रश्नावर जागृत करण्याचा प्रयत्न करणं हा उपाय आहे.

म्हणून,

नजीक काय घडेल सागता येत नाही.

पण.

कुणास ठाऊक मला असं वाटतं की शेवटी यातून जे घडेल, बाहेर येईल ते आसामच्या, भारताच्या हिताच ठरेल. याला मी तर्कशुद्ध कारण देऊ शकत नाही. पण शेकडो जणांना भेटल्यावर, आदोलनाच्या चागल्या–वाईट बाजू समजावून घेतल्यावर, समाजाचं अलोट नीतीधैर्य पाहिल्यावर मनात आलेली ही सहज प्रतिक्रिया

आहे. सतत मरगळून पडण्याची ऐतिहासिक सवय लागलेल्या या देशाला असं गदगदवून हालवून सोडणारी आंदोलने हवीच आहेत. तरच काही जागृतीची शक्यता आहे. नाही तर स्वातंत्र्यप्राप्तीचं युद्ध जिंकून जणू थकलेला 'मुचकुंद' आपल्या सुरक्षित गुहेत जाऊन झोपायला सरावलेलाच आहे ! □

## 'न लिहिलेलं पान'

सकाळी उठलो तर कुठून तरी 'ऐ मेरे वतनके लोगो.'

पाठोपाठ पंडितजींची आठवण अटळ. My heart goes with the people of Assam. या वाक्याच्या संदर्भात आसामहून परत आल्या आल्या मी 'हकीकत' पाहिला होता त्यात पंडितजी दिसले होते.

जरा नकाशात पहा. चिनी सैन्य ६२ साली तेजपूरपर्यंत आलं होतं ही कल्पनाच सहन होत नाही. ६२ साली आलं होतं तर ८२ मध्ये येणार नाही हे कोणी सांगितलं ? या एका वेगळ्याच रंगामुळं तर ईशान्येतल्या सर्व घडामोडींना एक विलक्षण नाजूकपण प्राप्त होतो.

आंदोलनाचा तिढा अजून पडलेलाच आहे. सरकारने विद्यार्थ्यांच्या बाकी सर्व मागण्या मान्य करून कार्यवाहीला सुरुवातही केली; पण परकी नागरिक शोधण्यासाठी आधारवर्ष '५१ का' ७१ या मुद्द्यावर बोलणी पुन्हापुन्हा फिस्कटतायत. म्हणजे पुन्हा प्रश्नचिन्ह—??

याचा अर्थ आसाम-प्रश्न ही भारताची एक ठसठसती जखम होऊन रहाणार ! आधीच अशा चिघळलेल्या जखमा कमी आहेत. त्यात ही एक आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या जागेत जखम आहे ! आज ती ताजी आहे, शुद्ध आहे. उद्या यात द्वेषाचं, भारतविरोधी भावनेचं सेप्टिक झालं तर प्राणघातक फुटीरता उत्पन्न होणंही काही अगदीच अशक्यप्राय नाही उलट तसं व्हावं यासाठी टपलेले बरेच जण आहेत!

माझ्या डोळ्यासमोर काही चित्रं आहेत. ती अशी—

एक : गोहाटीतला 'युनियन हॉल'. भिंतीवर लचित बदफुकनचे चित्र. कोपऱ्यात मनुष्याएवढ्या आकाराचा लचितचा उग्र पुतळा हातात उगारलेली तलवार. अशा आवेशात की समोर येईल त्याचे तुकडे पाडणार आणि त्या पुतळ्याशेजारी एक नवी घोषणा लिहिलेली.

'तलवार उचलणार नाही—
आणि उचलली तर खाली ठेवणार नाही! —'

दोन : जेवण उरकून रात्री घरी परतत असताना एका रस्त्याच्या कोपऱ्यावर ज्यानं आम्हाला गाठलं असा एक राजकुमार नावाचा आसामी तरुण सुनसान रस्त्यात, ट्यूबखाली उभा राहून इकडे तिकडे बघत होता. तो आम्हाला सांगतोय—' आम्ही घरात तलवारी जमवायला सुरुवात केली आहे!'

तीन : आसामच्या भोवती दबा धरून बसलेल्या विदेशी शक्ती संधी मिळताच आसामचा लचका तोडायला सज्ज—

भारतोय

समारोप : आसपासचे जग सगळे
जनावराचे आहे काय ?
इकडे पिंजारलेला लाल डोळ्यांचा ड्रॅगन
त्याच्या शत्रूच्या गळ्यात टाकण्याच्या
लाल फासाचा
आम्हाला एक भाग बनवू पहातोय.
हे आमच्यातल्याच कित्येकांना पटत नाही.
तिकडे जवळिकीचे नाटक करीत
जीव घेणारे
पोलादी पडद्यातले अस्वल
त्याने तूर्त एक शिकार तर मिळवलीच.
याचा उत्तरार्ध काय आहे कुणास ठाऊक ?
आक्रमकांना सतत आत यायलाच
जिचा उपयोग होतो, गेल्या हजार वर्षात
जिथून आजपर्यंत घुसलेले आक्रमक
परत गेल्याचा इतिहास नाही
ती खैबरखिंड शेजारीच आहे.
शेजारी लागूनच मोकळा असलेला
डावपेचात इतरांना
उपयोगी पडणारा लाडगा.
'हजार वर्षे मी तुला फाडत आलोय
आता सुद्धा फाडणार !'
ही त्याची भाषा फारशी जुनी नाही.
त्यापलीकडे, मावळतीला,
मानवी मूल्यापेक्षा
आपल्या लष्करी मालासाठी बाजारही शोधणारे
कावेबाज कोल्हे.
हे सगळे मोकळे.
आम्ही मात्र पिंजऱ्यात.
आम्ही माणसे आहोत हा काय आमचा दोष?
आमच्याजवळ धारदार नख्या नाहीत.
गळे कापता येतील असे केस नाहीत.
रक्ताने माखलेले दात नाहीत,
किंवा मानवता,
बिनदिक्कत पायदळी तुडवायला
तात्त्विक पाठबळ देणारा जडवाद नाही.
हरकत नाही.
जड सामर्थ्याने उन्मत्त झालेल्यांना
वठणीवर आणायचे असते,
आणता येते,
असे सांगणारा ठेवा मात्र आहे.
तेच आमचे सामर्थ्य आहे.
हे या जनावरांना कधी कळणार नाही !

शुक्रवार, चौदा नोव्हेंबर ऐंशी
□

## पुस्तकं

विजय कुवळेकर

# ईशान्य भारताच्या अशांततेचा माहितीपूर्ण वेध

काही प्रमाणात अरुणाचल प्रदेशाचा अपवाद वगळता संपूर्ण ईशान्य भारत आज अशांत आहे. प्रत्येक राज्यास या ना त्या निमित्तानं संघर्ष चालू आहे. गेले काही महिने त्याची तीव्रता वाढलेली आहे. देशाच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा सीमेवरचा हा संपूर्ण दोन लाख पंचावन्न हजार चौरस किलोमीटरचा प्रदेश अस्वस्थतेनं, अशांततेनं ग्रासला आहे. देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं धोकादायक आणि चिंताजनक अशी ही परिस्थिती आहे. ती कशामुळे उद्‌भवली आहे आणि आज तिला एवढं उग्र स्वरूप का प्राप्त झालं आहे, याचा माहितीपूर्ण वेध चंद्रपूरचे पत्रकार प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी '**आसाम– ईशान्येचा अशांत परिसर**' या पुस्तकात घेतला आहे.

अरुणाचल प्रदेश, मेघालय, नागालँड, मिझोराम, त्रिपुरा आणि आसाम ही ईशान्य भारतातली राज्यं. आज या सर्वांमध्ये जास्त अशांतता आणि अस्वस्थता आहे ती आसाममध्ये. एक अभूतपूर्व असा संघर्ष तिशीतल्या तरुणांनी तिथे जवळजवळ गेलं वर्षभर चालवला आहे. राष्ट्रीय महत्त्वाच्या अशा प्रश्नावर या पुस्तकात प्रमुख भर आहे हे त्याच्या नावातच स्पष्ट आहे, ते योग्यच आहे. कारण इतर राज्यांपेक्षा आसामचा प्रश्न अधिक महत्त्वाचा, अधिक दूरगामी परिणाम साधणारा आणि ज्याच्यात राष्ट्रीय हित मोठ्या प्रमाणावर गुंतलेलं आहे, असा आहे. असं असूनही या प्रश्नाबद्दल म्हणावी तितकी जागृती देशाच्या इतर भागात दिसत नाही. महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. वृत्तपत्रं आणि नभोवाणी–दूरदर्शन या माध्यमातूनच प्रामुख्यानं जनतेला या आंदोलनाची माहिती मिळते आहे ती बव्हंशी वरवरची आहे, तात्कालिक आहे. मुळात जाऊन कारणांचा शोध घेणारी नाही. त्यामुळे या समस्येची विस्तृत माहिती लोकांपर्यंत पोहोचलेली दिसत नाही. राजकीय आणि त्यातही प्रामुख्यानं सत्तारूढ काँग्रेस (आय) च्या नेत्यांची विधानं वस्तुस्थिती डावलणारी तर आहेतच; पण त्याबरोबरच आसाम आंदोलनाबद्दल दिशाभूल करणारी, गैरसमज निर्माण करणारी आहेत. अशा स्थितीत आसामचा मूळ प्रश्न आणि आंदोलकांची भूमिका विस्तारानं एकत्रितपणे लोकांपुढे मांडली जाणं आवश्यक होतं. ते काम या पुस्तकाद्वारे प्रा. द्वादशीवार यांनी केलं आहे.

आसाममध्ये १९५१ नंतर बेकायदेशीरपणे आलेल्या परकीयांची हकालपट्टी करावी, ही आंदोलकांची मुख्य मागणी आहे. आसाममधून गेली अनेक वर्षं ही मागणी केली जात होती. स्वातंत्र्यानंतरच नव्हे, तर स्वातंत्र्यापूर्वीही म्हणजे जवळजवळ गेली पावणेदोनशे वर्षं आसामला घूसखोरांची समस्या भेडसावते आहे. त्या त्या वेळी तिथे आंदोलनंही झालेली आहेत; पण १९०१ पासून परकीयांच्या आसाममधल्या घूसखोरीचं प्रमाण वाढलं. राजकीय फायद्याच्या दृष्टीनं हे घूसखोर संघटित झाले. ब्रिटिश राजवटीच्या अखेरच्या काळात तर आसामचा बराच भाग मुस्लिम बहुसंख्यांक करण्याच्या प्रयत्नांना बॅ. जीना आदींचा सक्रिय आशीर्वाद लाभला. त्यात तणाव वाढले; पण त्या हानीनं स्वातंत्र्योत्तर राज्यकर्ते शहाणे झाले नाहीत. मुस्लिम अनुनयाचं धोरण त्यांनी राजकीय स्वार्थासाठी चालू ठेवलं. काही अपवाद वगळता बहुतेक राजकीय पक्ष पक्षीय स्वार्थाच्या भूमिकेतूनच या प्रश्नाकडे पहात आले. त्यामुळे घूसखोरीला त्यांचं अप्रत्यक्षपणे उत्तेजनच लाभलं. गेल्या तीस वर्षांत त्यामुळे आसाममध्ये मूळचे आसामीच हळूहळू बाजूला पडत गेल्यासारखे झाले आहेत. आसामी जनता आणि आसामी संस्कृती यांचं अस्तित्वच धोक्यात आल्याची विदारक जाणीव तिथल्या जनतेला झाली आणि त्यातूनच आजचं आंदोलन उभं राहिलं आहे.

'अखिल आसाम विद्यार्थी संघटना' (आसू) आणि 'अखिल आसाम गणसंग्राम परिषद' या युवक–संघटना आजचं आंदोलन चालवीत आहेत. कोणत्याही राजकीय पक्षाला त्यांनी आंदोलनात स्थान दिलेलं नाही. त्यांच्याकडे मान्यवरातले नेते नाहीत. विशिष्ट आंदोलन–पद्धतीची चाकोरी नाही. तरीही त्यांनी जनतेच्या पाठिंब्यावर एक अपूर्व असं जन-आंदोलन उभं केलं आहे. परिस्थितीनुरूप आंदोलनाचं तंत्र ठरवून यशस्वी करत आणलं आहे. गोहाटीत संचारबंदी लागू होऊन २० एप्रिलला सैन्य दाखल झालं तेव्हा महात्मा गांधींची छायाचित्रं घेऊन शांतपणे हजारो मुलं–तरुण–तरुण–वृद्ध स्त्री पुरुषांनी रस्त्यावर येण्याचा आगळा विक्रम सतर्क कल्पकतेतूनच त्यांनी घडवून आणला. हजारो लोकांच्या शांततामय समुदायापुढे पोलिसांच्या किंवा सैनिकांच्या संगिनी काहीही करू शकल्या नाहीत. हे यश वेगळं आहे. सर्वसाधारण जनतेचा पाठिंबा आणि तोही सर्वस्वानिशी सक्रिय पाठिंबा असल्यामुळेच आंदोलकांना ते मिळवता आलं.

प्रा. द्वादशीवार यांनी हा सारा इतिहास

थोडक्यात, पण प्रभावीपणानं दिला आहे. तो वाचला की, 'या आदोलनाला बहुसख्य जनता उबगली आहे' 'आंदोलकाना फार थोडचा लोकाचा पाठिंबा आहे' अशासारख्या सत्तारूढ पक्षाच्या नेत्याच्या विधानांना कितपत अर्थ आहे, हे लक्षात येतं.

प्रा द्वादशीवार यानी उल्लेख केलेल्या आणखी काही गोष्टीही महत्त्वाच्या आहेत. साहित्यिक,सरकारीअधिकारी, गृहिणी, युवकयुवती,बगाली तरुण, मुस्लिम तरुण अशा अनेकाचा या आंदोलनात सहभाग आहे, हे त्यानी आवर्जून नोदविल आहे. सर्व स्तरातून आदोलनाला प्रतिसाद आहे, हे त्यातून स्पष्ट होत. त्यावरोबरच 'हे आदोलन बगाल्याविरुद्ध आसामी लोकानी चालवलेलं आहे' किंवा 'मुस्लिमविरोधी आहे' असा जो प्रचार पत्रप्रधान श्रीमती इदिरा गाधीपासून अनेक सत्तारूढ नेते करतात त्याची सत्यासत्यताही त्यातून दिसून यत. आसाममध्ये सुमारे पन्नास लाख परकीय आहेत. त्यात साधारणतः सदतीस लाख मुस्लिम आहत, आणि तेरा लाखाच्या आसपास हिंदू आहत; पण या सर्वानाच घालवून द्याव, अस आदोलकाच म्हणण आह. याउलट राजकीय पक्षप्रामुख्यान काग्रस (आय) आणि कम्युनिस्ट पक्ष-हच जातायवादा भूमिकेतून या प्रश्नाकड पहात आहत. कारण मुस्लिम ह काग्रसच आणि आता काग्रस (आय) च मतदार आहत, तर घुसखार हिंदू ह कम्युनिस्टाना मत दत आल आहत. त्यामुळ परकायाना बाहर घालवायला ह पक्ष पाठिंबा द्यायला तयार नाहात, हा वस्तुस्थिता प्रा. द्वादशीवार याना माडला आह.

'आसाम आदोलन राष्ट्रीय एकात्मतेला मारक आह', असाहा प्रचार कला जात आह, पण काणत्याहा प्रकार जातायवादा अगर प्रातवादा अस ह आदालन नाहा. राष्ट्रीय प्रवृत्ताच आणि राष्ट्राहिताचच काम आपण करता आहात, अस विद्याथ्यांच सार्थ प्रतिपादन आह. राष्ट्रप्रमाच्या तळमळीतून आपण चालवलल्या या आदोलनाकडे इतर राज्यातल्या जनतन म्हणाव तितक लक्ष देऊ नय, याचीच आदालकाना खत आहे. विविध कार्यकत्याच्या मुलाखतीतून तो व्यक्त झाला आहे. 'आम्ही भारतीय म्हणून लढतो आहोत. भारतीय म्हणूनच आमचो मरण्याचीही तयारी आहे. एक ना एक दिवस या देशातल्या आमच्या भावा—बहिणीना आमची व्यथा समजेल. मग तेही आमच्या समर्थनासाठी उभे होतील !' हे कु. सविता गोस्वामीच्या मुलाखतीतले उद्‌गार पुरेसे बोलके आहेत.

बगाल्याविरुद्ध हे आदोलन नसलं तरी आसामी जनतेच्या मनात बगाल्याबाबत आकस आहे, ही वस्तुस्थिती त्यानी लपविलेली नाही. असा आकस असायला अनेक कारण आहेत आणि प्रामुख्यान तो आर्थिक वर्चस्वाबद्दलची आहेत. १८२६ मध्ये 'ईस्ट इडिया कपनीन आसास ताब्यात घेतल्यानतर कारभारासाठी बगाली बाबू आणले. त्याचा कारभार जाचक होता. तेव्हा शाळा आणि न्यायालयात असलेल आसामो भाषच माध्यम बदलून बगाली बाबूनी ते बगाली केल. त्याविरुद्ध १८७२ मध्य आदोलन झालं होत. नंतरच्या काळात आसाममधल्या जमिनी बगाल्यानी घतल्या. आजही आसाममध्ये जवळजवळ सर्व जमीनदार बगाली आहेत. एकहा आसामी बडा जमीनदार नाहा. 'आसामी लोक बगाल्याना आपले गुलाम वाटतात,' हा खत आजही आसामी जनतेच्या मनात आह. स्थानिक बगाली, विचारवतही त नाकारत नाहात, पण या परिस्थितीचा आदोलनात मात्र परिणाम झालला नाहा. आन्दोलनात 'परकीय नागरिक विरुद्ध स्थानिक जनता' असाच प्रश्न आहे. हिदू असात अगर मुस्लिम असोत जे जे परकीय आहत त्याना बाहर घालवा, असाच आदालकाचा आग्रह आह. बगाली पत्रकार आपल्या, आदालनाबद्दल विपर्यस्त चित्रण करत असल्याचा त्याचा तक्रार आह, तीत तथ्य आहे.

अशा प्रकारे काही गटाकडून होणार विपर्यस्त चित्रण, इतर प्रांताकडून नगण्य प्रतिसाद आणि केन्द्राची राजकीय डावपेचाची भूमिका यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आज काही प्रमाणात नैराश्य दिसू लागल आहे. यातूनच फुटीर प्रवृत्तीना शिरकावाला सधी मिळण्याचा धोका नाकारता यत नाही. तस झालं तर, विद्यार्थ्यांनी आजवर अत्यंत शांततापूर्ण रीतीन आणि राष्ट्रीय वृत्तीनं चालविलेल्या या आदोलनातून वेगळ प्रवाह निर्माण होण्याची भीती आहे, याची जाणीव आपण वेळीच बाळगणं आवश्यक आहे.

राजकीय नेत्यांवर आसामी जनतेचा फारसा विश्वास उरलेला नाही. सत्तारूढ सरकारच्या भूमिकेमुळे या अविश्वासात भर पडते आहे. आसामचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बारडोलोई सोडले तर इतर बहुसख्य नेत्यानी आसामचा विश्वासघात केल्याची जनतेची भावना आहे १९५० ला लियाकत अलीशी करार केल्यावर बारा वर्षांनी पं. नेहरूंना परकीयाच्या घुसखोरीची जाणीव झाली होती. त्याआधी सरदार पटेलानी ही घूसखोरी मोडून काढण्यासाठी प्रयत्न केले होते; पण राजकारणी मडळीचाच विरोध त्याना पत्करावा लागला आणि प्रयत्न अर्ध्यावर असतानाच दोघाचही निधन झाल. शास्त्रीजीच्या बाबतीतही तेच घडल. मोरारजी देसाई पतप्रधान असताना जनता सरकारन मतदार—यादा नूतनीकरण—दुरुस्तीचे आदेश दिले होते; पण तेव्हा विरोधी पक्षनेते असणाऱ्या यशवतराव चव्हाणानी त्याला विरोध केला. नतर मोरारजी सरकार जाऊन चरणसिंग सरकार आल. त्यात यशवतराव गृहमंत्री होत, यातच या प्रश्नाचा निकाल आला. दुरुस्त्या न होताच निवडणुका घेण्याचा प्रयत्न झाला आणि तेव्हाच आदोलनाचा खऱ्या अर्थान प्रारभ झाला. राजकारणी मडळीचा हा अनुभव घेतल्यामुळेच विद्यार्थ्यानी त्याना दान हात दूर ठवल आहे. तरीही राजकारणी मडळी काही बोध घ्यायला तयार दिसत नाहीत. आजवर विद्यार्थ्यांनी इदिरा गाधीसारख्या अत्यत धूर्त राजनीतिज्ञ नेतृत्वाशी सामना दिला आहे. त्याच्या डावपेचाना ते तोडीस तोड उत्तर देत आल आहेत. त्याच्या या निपुणतेच कौतुकच कल पाहिजे !

आसाममध्ये होणाऱ्या क्रूड तेलाची नाकेबदी करून विद्यार्थी देशाच नुकसान करीत आहेत, अस वारवार हे नेते सागत असतात. अस नुकसान होत आहे, हे खरं आहे; पण आदोलकाजवळ एवढच एक शस्त्र आहे. ते सोडून त्याना चालणार नाही, म्हणूनच त्यानी ही नाकेबदी चालविली आहे; पण ज्या तेलाबद्दल राज्यकर्ते एवढ्या उच्च रवानं सागतात त्याच्या उत्पन्नातला किती वाटा आसामला मिळतो, हे मात्र ते सागत नाहीत. वर्षाला आठशेबचाळीस कोटी रुपयांचं तेल आसाममध्ये तयार होतं, पण

त्याचं शुद्धीकरण करणारे कारखाने मात्र बिहारमध्ये आहेत आणि आसामला रॉयल्टी मिळते फक्त बावीस कोटी रुपये !

आसामकडे आर्थिक दुर्लक्ष, विकासाकडे दुर्लक्ष, सस्कृतीच्या जतनाकडे दुर्लक्ष अशा अनेक दुर्लक्षामुळे आज आसामची जनता पेटून उठली आहे. प्रा. द्वादशीवार यानी त्यातल्या राजकीय बाजूवर जास्त भर दिला आहे; पण त्यात आदोलनाच्या इतिहासातल २० एप्रिलचं अभूतपूर्व पर्व त्यानी समक्ष पाहूनही त्याचं प्रत्ययकारी चित्रण त्यानी केलेलं नाही. तो महत्त्वाचा दिवस तसा टिपला जायला हवा होता. आर्थिक आणि सास्कृतिक बाजूचा ओझरता उल्लेख आहे; पण त्याचा आणखी तपशील हवा होता. आसामी सस्कृतीच्या जतनासाठी घटनात्मक हमी आणि आर्थिक विकासाची हमी याही आदोलकाच्या मागण्या आहेत. त्यावर अधिक विस्तारानं विवेचन हवं होतं. आसामचा प्रश्न सर्व बाजूनी परिपूर्ण स्वरूपात समजायला त्यामुळे मदत झाली असती.

या पुस्तकात 'आसाम' हा प्रमुख विषय असल्यामुळे जवळजवळ निम्मा भाग त्यावर विवेचन आहे. इतर भागात मणिपूरमधली 'पीपल्स लिबरेशन पार्टी', मैती जमात यांचं फुटीर राजकारण आणि विद्यार्थी संघटनेचं आदोलन, नागालँड- मिझोराममधल्या फुटीर चळवळी, त्रिपुरातला बागला देशीय आणि स्थानिक जमाती यातला सघर्ष, मेघालयातला सुरक्षिततेचा प्रश्न आणि समिश्र आदोलन आणि अरुणाचलमधला मिशनऱ्याच्या प्रभावाचा पेच याचा परिचय आहे. त्या त्या राज्यातल्या राजकीय- सामाजिक प्रवाहाची धावती ओळख त्यात आली आहे नागालॅण्ड–मिझोराम याना त्यात जास्त स्थान दिलं आहे. एकुणात या राज्यामध्ये ख्रिश्चन मिशनऱ्याचं आणि फुटीर शक्तीचं जाळं कसं काम करत आहे, याची कल्पना त्यावरून येते; पण याहून अधिक सखोल विश्लेषण त्यातून मिळत नाही ते अपेक्षितही नसावं. कारण प्रामुख्यानं ईशान्य भारतातल्या अशाततेची कारणं आणि स्वरूप जनतेला समजावून देण, हाच लेखकाचा प्रमुख हेतू आहे. तो पूर्णांशानं साध्य झाला आहे, असं म्हणता येईल.

या सर्व विवेचनातून एक गोष्ट ठळकपणे जाणवते. ती म्हणजे आसामचा प्रश्न हा भारतीय विरुद्ध परके असा आहे, तर इतर राज्यामध्ये मात्र स्थानिक जमाती विरुद्ध उपरे असा संघर्ष आहे शिवाय इतर फुटीर चळवळीचे प्रवाह त्यात येऊन मिसळले आहेत म्हणजेच आसामच्या प्रश्नाची इतर राज्यामधल्या सघर्षाशी तुलना करून चालणार नाही. (प्रा. द्वादशीवार यानी तसं केलेलंही नाही )

प्रा द्वादशीवार यानी २६ एप्रिल ते ३० मे १९८० या काळात नागपूरच्या 'तरुण भारत'मध्ये लिहिलेली ही वार्तापत्र आहेत. कोणताही बदल न करता ती पुस्तकरूपानं प्रसिद्ध केली आहेत. पुस्तकासाठी सस्करण केल असतं तर अधिक सुसूत्रता आली असती. ते अधिक परिणामकारक ठरलं असतं. विशेषतः वृत्तपत्री भाषेच्या बाबतीत थोडे संस्कार आवश्यक होते. काही छायाचित्र असती तर ते विषयाला पूरक ठरल असतं.

एकुणात, एका महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नाचा विस्तृत परिचय योग्य वेळी करून देण्याचं महत्त्वाच कार्न प्रा. द्वादशीवार यानी या पुस्तकाद्वारे पार पाडलं आहे, त्याबद्दल त्याचं अभिनंदन !

**आसाम–**
**ईशान्येचा अशांत परिसर**
प्रा सुरेश द्वादशीवार
प्रकाशक . दिग्विजय प्रकाशन, चंद्रपूर
पृष्ठे ८ + १००, किंमत : १० रुपये

---

## फिनिक्स निवड

# Mao :

A Biography by Ross Terrill.

---

चीन. एक कोड. वर्षानुवर्ष बंदिस्त. ग्रेट वॉलच्या मागे जगातील दुसऱ्या देशाबद्दल कमालीचे भयगंड बाळगणारे. Xenophopic.दुष्काळ, भूकंप, रोगराई वगैरे नित्याच्या बाबी स्वत.चे व्यक्तिमत्व, स्वत चे पावित्र्य, स्वत ची ओरिजीनॅलिटी टिकवून ठेवण्यासाठी Isolation असते का? Isolation मुळे मनाची स्वयंचलित यत्रणा एक प्रकारचा ताठरपणा निर्माण करते व हा ताठरपणा बऱ्याच वेळा गुर्मी म्हणून समजला जातो. श्री टॅरिल असे म्हणतात की चीनच्या आयझोलेशनबरोबर त्याचा उर्मटपणाही कमी झाला आहे. तो इतका की चीन आता कधी कधी मार्गदर्शनासाठी दुसऱ्याकडे बघत आहे. श्री. टॅरिल याचे म्हणणे असे आहे की चीनमध्ये लाल क्राती झाल्यावर तो इतर जगाची दखल घ्यायला लागला. चीनविषयी मला नेहमीच फार उत्सुकता असते. थोड्या दिवसांपूर्वी एका मासिकाच्या संपादकाने वरील पुस्तकाच्या लेखकाची मुलाखत घेतली होती त्या मुलाखतीवर हा लेख आधारित आहे. सर्व तपशील देणे शक्य नाही त्यामुळे माहिती त्रोटक व गरागरा फिरणारी वाटणे साहजिकच आहे कधी कधी मुलाखत घेणारेच तसे प्रश्न विचारतात त्यामुळेही असे वाटत असावे. मुलाखत घेणाऱ्यानी प्रश्न कसेही विचारले व उत्तर देणाऱ्यानी जर रोखठोक व प्रामाणिक उत्तरे दिली तर मुलाखत सपक व सावध होत नाही.

श्री टॅरिल हे चायना वॉचर द सीनॉलॉजिस्ट आहेत. जगात बर्ड वॉचिंगप्रमाणे चायना वॉचर्सही वाढत आहेत की काय? कारण मला असे कळते की श्री. टॅरिल यानी चीनवर बरीच पुस्तके लिहिली आहेत. आमच्या ग्रथालयात चीनवर गॅलब्रेथचे 'चायना, पॅसेज'के. पी. एस. मेननचे 'ट्वायलाइट इन चायना,' रॉजर हॉवर्डचे 'माओ त्से तुग अॅन्ड द नायनीज् पीपल', एडगर स्नो ची चीनवरील सर्व पुस्तके, सीमॉन लेज चे 'चायनीज शॅडोज', मराठीमध्ये नार्रगोलकराचे 'आम्ही पाहिलेला चीन', सौ. सुलोचना लिमये यानी राजा हाथीसिंगच्या 'ग्रेट पीस' या पुस्तकाचा केलेला मराठी अनुवाद अशी पुस्तके आहेत. या पुस्तकाची नावे समोर आली की चीन हा एक नसून अनेक आहेत असे वाटते. कॅलायडास्कोप एकदा फिरवला की डिझाइन बदलते, त्याप्रमाणे प्रत्येक वेळेला प्रत्येक पुस्तकात चीनच वेगळंच रंग-रूप दिसायला लागतं. अर्थात् इतर देशातील प्रवासवर्णनातसुद्धा त्या त्या लेखकाचा वैयक्तिक ठसा उमटत असतो. त्यामुळे प्रत्येकात थोडासा कॅलायडास्कोपिक इफेक्ट असतोच, पण चीनच्या बाबतीत हा असर फारच जाणवतो. चीन हा असा एक

देश आहे की जणू तो विश्वाच्या सुरुवातीपासूनच तेथे आहे व तेथेच तो राहील असे आपल्याला वाटते. लाख, दोन लाख चिनी मेले तर त्याच्या जागी त्याच्यासारखेच दीड-दोन लाख हजर. ग्रेट वॉलच्या रस्त्यावर, (या वॉलवर चालण्यासाठी अक्षरश. रुंद, थोडासा धरणासारखा रस्ता आहे ! ) तेथील नद्या व पहाडावर, तेथील कम्युन्समधील शेतावर व आकाशावर, जशी एक प्रकारची Continuity जाणवते तशीच ती चीनच्या प्रजेवर जाणवते मोठा धरणीकंप झाला तर चिनी माणूस त्याच्या दोऱ्यासारख्या तुकतुकीत मिशीवर हात फिरवीत History चा course पुढे जावा म्हणून as a matter of course जमिनीखाली मस्ख तोडाने जात असतो शापित लोकात एक प्रकारची भयप्रद चिकाटी तरी येते किंवा मस्ख सोशिकता तरी.

श्री. टेरिल हे चीनमध्ये सहा वेळा जाऊन आले. एके काळी ते ऑस्ट्रेलियन होते. काही दिवसापूर्वी एका इग्रजी वर्तमानपत्रात एक कार्टून आले होते. त्यात उत्तर भारतातील पुराबद्दल सी आय. ए. ला दोषी ठरवले होते. तसेच उभ्या आशिया खंडात जे काही वाईट घडत असते ते चीनमुळेच घडते असे शिक्षण एके काळी ऑस्ट्रेलियात देत असत. या वेळेस डलसची मतं प्रचलित होती ही गोष्ट १९५० ते १९६० या सुमाराची. पण श्री. टेरिल हे मूळचे बंडखोर. Minority is always right, वगैरे मानणारे. त्यामुळे ते १९६४ साली पहिल्यादा चीनमध्ये गेले. त्यानी पुष्कळ वेळा व्हिसा (Visa) मिळवण्याचा प्रयत्न केला, पण चिनी अधिकाऱ्यानी तो नाकारला एकदा ते वार्सात असताना तेथील चिनी प्रतिनिधीला म्हणाले, 'एका विद्यार्थ्याने तुमच्या चीनबद्दल शिकावे असे तुम्हाला वाटतच नाही.' या विधानामुळे मग त्याना ज्येष्ठ अधिकाऱ्यापुढे नेण्यात आले व परवानगी दिली गेली

श्री. टेरिल म्हणतात की चीन हे रशियासारखे इम्पिरिॲलिस्ट नाही. कन्फूशियसनंतरची संस्कृती थोडी स्वत पुरती अहगंडयुक्त होती. ख्रिश्चन धर्माच्या अहगंडामुळे पाश्चात्यानी जगभर आक्रमण केले; पण चीनची संस्कृती, चीनचा पेहराव तसा फारसा आक्रमक नव्हता. चीनच्या आतल्या आतच त्याच्या संस्कृतीची जोपासना केली जात होती. ती दुसऱ्यावर लादण्यापुरेसा प्रयत्न कधीच झाला नाही.

चीन हा इतका Xenophobic होता की एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला शिक्षित चिनी माणसाला अमेरिका किंवा फ्रान्स कुठे आहे याची काहीच माहिती नव्हती.

१९६० सालानंतर सर्वांनाच वाटले होते की चीनच्या हातात अणुबॉब आला आहे म्हणजे माकडाच्या हातात कोलीत, पण तसे काही झाले नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे चीन व रशिया याच्यामध्ये झालेला दुरावा.

अमेरिका चीनकडे नेहमीच आशाळभूत नजरेने बघत असते तो तिथला प्रचंड जनसमुदाय लोकशाहीकडे कसा झुकेल या दृष्टिकोनातून. अण्वस्त्राची खरी भीती चीनच्या लहान-मोठ्या शेजाऱ्याना आहे, पण अमेरिकेला नाही असे श्री टेरिलना वाटते.

चीन युद्धशास्त्रात नं. तीनचा देश आहे, असे श्री टेरिलना वाटते. चीनची क्षेपणास्त्रे जपानला नेस्तनाबूद करू शकतील. चीनचे सैन्य लाओस कंबोडिया व व्हिएटनाम केव्हाही काबीज करू शकते; पण चीनच्या सैन्यात पैशाअभावी अजून व्हावे तेवढे आधुनिकीकरण झालेले नाही.

रशियाने अफगाणिस्तानच्या पुढे आणखी घुसखोरी केली तर कदाचित अमेरिका व चीन हातमिळवणी करतील, पण युद्धशास्त्रात रशिया अमेरिकेपेक्षा फार पुढे आहे, हे मी सांगितलेच आहे. म्हणूनच रशिया छोट्या कुरापती काढू शकतो.

एके काळी रशियाचे नाव निघाले की चीन थियरत असे, पण श्री टेरिल याच्या म्हणण्याप्रमाणे चीन आता आपल्या लोकाचे राहणीमान सुधारावे यातच इतका दंग झाला आहे की त्याला पूर्वीइतके ॲन्टी-रशियन व्हायला वेळच नाही !

चीनमध्ये आता पूर्वीसारखे कोर्टातील खटले गुप्तरीत्या चालत नाहीत. ट्रायलशिवाय आता तेथे कुणालाही पाच महिन्यांपेक्षा जास्त काळ तुरुंगात डाबता येत नाही.

चीन व रशिया या दोघात स्वतत्रतेत कोण आघाडीवर आहे, असा श्री. टेरिल याना प्रश्न विचारला जाणे हे अपेक्षितच होते याचे श्री. टेरिलनी असे उत्तर दिले की रशिया हुकुमशाहीकडे अधिक झुकलेला आहे.

वर्गकलह, वर्गकलह (Class struggle) हे पूर्वीचे पालुपद आता तिकडे ऐकू येत नाही काही तरुणवर्गांनी बंड पुकारले तर त्याना प्रतिगामी म्हणून लेबल लावले जाते. थोडक्यात म्हणजे जो कुणी सरकारवर टीका करेल तो 'Counter-revolutionary.'

वाढत्या रशियन सामर्थ्याला उत्तर म्हणून नेटॉ, युएसए, जपान व चायना यानी एकत्र येऊन बसावे व काही तरी बोलावे असे श्री. टेरिल सुचवतात. काय बोलेल ते अर्थात् गुपित ठेवावे. ते एकत्र आलेत हे बघूनच रशिया थोडा ताळ्यावर येईल असे श्री. टेरिल म्हणतात.

रशिया व अमेरिका याच्यामध्ये जे विचाराचे युद्ध चालले आहे, हुकूमशाही की लोकशाही याचा जो रणसंग्राम चालला आहे त्याची सांगता Power grows out of the barrel of a gun या अनुषंगाने होणार नाही, हे श्री. टेरिल याचे म्हणणे पटते. शेवटी लोकाचे राहणीमान कोण सुधारतं या मुद्द्यावर त्याच्या विचारप्रणालीचा विजय होईल हेच बरोबर वाटते.

**जे. एन्. पोंडा**


**SOME NEW TITLES RECEIVED**

1. **The Shah's Story** ( Autobiography of the Shah of Iran )— Rs. 125/—
2. **Chintaman and I**–( Autobiography ) Durgabai Deshmukh— 50/—
3. **Of Pedigree Unknown**–( for Dog-lovers ) Autobiography–Phil Drabble

**THE PHOENIX LIBRARY**
727, Sadashiv Peth, Pune 411 030

रंगभूमी

# संगीत नाटक शताब्दी निमित्ताने

मुकुन्द संगोराम

संगीत नाटक रंगभूमीवर आल्याला यदाच्या वर्षी शंभर वर्षे पूर्ण झाली. या शतकाच्या प्रदीर्घ कालखंडात संगीत नाटकावर आणि एकूणच मराठी रंगभूमीवर अनेक संकटे कोसळली. ती आर्थिक, सामाजिक होती; पण सगीत रंगभूमी मात्र तरीही काळाचे भान न ठेवता जुन्याचाच पुकारा करीत टिकून राहिली आहे हे विशेष!

या शताब्दीच्या वर्षात गेली शभर वर्षे होणारी नाटकेच पुन.पुन्हा सादर केली गेली. स्वातन्त्र्यपूर्व काळात ज्या नाटकाशिवाय रंगभूमीचे पान हलत नव्हते अशी स्थिती होती, ती नाटके स्वातंत्र्योत्तर तीस वर्षानंतर अजूनही दिमाखात प्रयोग करीत आहेत हे संगीत रगभूमीचे वैशिष्ट्य म्हणायला हवे.

संगीत नाटकाच्या या यशस्वितेचे गमक त्याच्या 'सगीतात' आहे हे अनेक ज्येष्ठ समीक्षकानी आणि या यशस्वी नाटकाच्या लेखकानीही मान्य केले आहे. आता ही नाटके अवीट राहिली नसली तरी त्यातील संगीत आणि त्यायोगाने सगीतक्षेत्रात नव्यानेच उदयास आलेला 'नाटघसंगीत' हा नवा कलाप्रकार मात्र खास अवीट आहे त्या रंगभूमीने सगीतक्षेत्राला दिलेला हा अमोल ठेवाच आहे असे म्हणायला हवे.

सगीत रगभूमीच्या शताब्दिनिमित्ताने भरत नाट्य मंदिर या हौशी कलावंताच्या सस्थेने पाच दिवसाचा सोहळा आयोजित केला. त्यामध्ये सौभद्र, मानापमान, शाकुंतल, सशयकल्लोळ व मृच्छकटिक ही पाच सगीत नाटके 'साग्र सगीत' सादर करण्यात आली, स्वरराज छोटा गधर्वांपासून हृषिकेश बोडस या नवोदित कलाकारापर्यंत अनेक कलाकारानी ही नाटके सादर करण्यात कसून मेहनत घेतली होती. सौभद्र आणि मृच्छाकटिक या नाटकांमधील प्रमुख भूमिका स्वत: स्वरराजानीच केल्यामुळे नाटके अधिक श्रवणीय झाली यात शकाच नाही. त्याच्या श्रवणीयतेत मधुवती दाडेकर, रामदास कामत याचाही वाटा आहेच. संशयकल्लोळमध्येही डॉ वसंतराव देशपाडेंच्यासारखा गायक व अभिनेता व फैय्याजसारखी नटी भूमिका करीत असल्यामुळे तोही प्रयोग नेटका झाला. मानापमानमध्ये दाजी भाटवडेकरा–सारखा कसलेला नट आणि जोडीला राम मराठे, रजनी जोशी याच्यासारखे गायक कलाकार असल्याने हाही प्रयोग श्रवणीय असाच झाला. शाकुतल हा नवोदित कलाकारानी सादर केलेला प्रयोगही 'चागला 'या दर्जाप्रत गेला.

ही पाचही नाटके पाहात (विशेषत: ऐकत) असताना आणि त्याआधी सौ. सुहासिनी मुळगावकर यानी सादर केलेला 'शतरंग' हा रंगभूमीवरील सगीताचा प्रवास व आलेख दर्शविणारा कार्यक्रम ऐकताना संगीत रगभूमीचे विसाव्या शतकाच्या अखेरीचे स्थान काय ? असा प्रश्न सतत डाचत होता. त्या अनुषगाने काही जाणवलेल्या गोष्टी प्रामाणिकपणे माडण्याचा हा खटाटोप.

संगीत नाटकाचा प्रारंभ १८८० साली झाला तरी त्यापूर्वीही सगीत नाटके होतच होती. शाकुतलसारखे कालिदासाचे नाटक मराठीतून सादर करण्यामागची एक भूमिका अशी असणे शक्य आहे की, लोकांना माहित असलेली कथा संगीताच्या माध्यमातून मांडायची, ज्यायोगे रसिकाची सगीत श्रवणाची तृष्णा भागू शकेल.त्या काळी आजच्यासारखा शास्त्रीय संगीताचा प्रसार फार झालेला नव्हता. लोकाना तर शास्त्रीय संगीत ऐकायची इच्छा; पण ही गाणी श्रीमंतांच्या वा राजेराजवाड्यांच्या दरबारात व्हायची. मग सामान्याना तेथे शिरकाव कसा मिळणार ? आणि त्यातून संगीतातील घराणेपरंपरा हे गाणे 'बाहेर' जाऊ देण्यास अनुत्सुक होती. आपलं गाणं कुणी 'चोरलं' तर काय ? या भीतीपोटी गाण्याचे जाहीर जलसे होत नव्हते.

त्या वेळी इग्रजाची साम्राज्यशाहीची पकड अधिक बळकट झाल्याने ती ढिली होण्याची आशाही कुणाला फारशी उरलेली नव्हती आणि म्हणूनच संगीत, नाटक या सास्कृतिक परंपरेकडे सामान्याचे लक्ष जायला सुरुवात झाली. या सामाजिक परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सगीत नाटक हा मोठा मार्ग (outlet) होता. सामान्य जनाना संगीत ऐकायची तर भलती ओढ बरे, त्या वेळचे शास्त्रीय सगीतही बोजडतेकडे झुकलेले. त्यामुळे भावगीताप्रमाणे फार हलकफुलकं नाही पण फार बोजड नाही अशा सगीतप्रकाराच्या शोधातून नाट्यसंगीताचा उदय झाला.

अण्णासाहेब किर्लोस्कराच्या पहिल्याच संगीत शाकुतल या नाटकात दोनशे पद्ये आहेत. यापैकी सुमारे नव्वद पद्ये साकी, दिंडी, अजनीगीत इत्यादी त्या वेळच्या प्रचलित वृत्ताच्या चालीवर रचलेली आहेत. बाकीच्या पद्यापैकी बरीचशी त्या काळी बहुतेकाना परिचित अशा देवादिकाच्या पदाच्या चालीवर आहेत.अगदी नवीन चालीवर म्हणजे लोकाना अपरिचित अशी सुमारे वीस पद्ये आहेत. म्हणजे हा कलाप्रकार लोकाच्या एकदम गळी उतरविण्याचा विचार अण्णासाहेबानी केला नाही. सुरुवातीला वीस पद्यापुरताच तो मर्यादित ठेवला पण त्या प्रकाराच्या लोकप्रियतेमुळे पुढे पुढे अशा नव्या चालीचे प्रमाण वाढत गले

या सगीताला एक परिपूर्ण आकार आहे. त्यातील शब्दानाही महत्त्व असते. कारण त्याद्वारे कथानकच सागायचे असते; पण तरीही शास्त्रीय सगीताची बैठक असल्याने चूष म्हणून थोडासा(च) विस्तारही हवा. रगभूमीच्या मर्यादामध्ये शास्त्रीय सगीताला बसवण्याचे हे काम सगीत रगभूमीने केले व त्यामुळे शास्त्रीय सगीताचा विस्तारही मोठ्या प्रमाणावर झाला. या रंगभूमीची ही फार मोलाची देणगी आहे.

या संदर्भात कै. गोविंदराव टेंबेंनी म्हटले आहे की, ' आमच्या संगीतशास्त्रातील राग–रागिणी ही अमूल्य रत्ने आहेत. स्वरात कंठाने व वर्ज्यावर्ज्यादि नियम पाळून कोणत्याही रागातील पद्याचा उच्चार केला की, एक निराळीच सृष्टी निर्माण होते. आणि थोड्याशा आलापचारीने त्या पद्याचा उद्देश सफल होत असे. त्यामुळे रागदारीच्या पदाचा सामान्य श्रोत्यावर देखील परिणाम होई. आपण काही तरी, कसल्या तरी शास्त्रीय खटाटोपाच्या आणि तानबाजीच्या जाळ्यात गुरफटून, घुममटून गेलो आहोत असे श्रोत्याना वाटत नसे. आपण नाटकातील पदच ऐकत आहोत परंतु काही तरी रम्य व नवीन स्वराच्या वातावरणात नकळत आकर्षिले जात आहोत अशी आल्हादकारक भावना सर्व दर्जाच्या प्रेक्षकात निर्माण होत असे'. (जीवनव्यासग, पृ. १३०)

या नाटकाचे विषयही कल्पनारम्य असत. श्री. वसंत शांताराम देसाईनी म्हटले आहे की, ' नाटक कल्पनारम्य असले ( Romantic) तरच संगीतामुळे त्याची आकर्षकता आणि परिणामकारकता वृद्धिंगत होते. त्या करिता नाटकाचे कथानक पौराणिक किंवा काल्पनिक असले पाहिजे किंवा ते शृंगाररस प्रधान असले पाहिजे असे नाही. एकच प्याला नाटकासारख्या सामाजिक शोकांतिकेतील सिंधुचे स्वभावचित्रण कल्पनारम्यच समजले पाहिजे.' या कल्पनारम्यतेमुळे नाटकाची रजकता अधिक जपली जात असे. या रंजकतेमध्ये भर म्हणून सगीतासारखी सुश्राव्य रजनकला रगभूमीशी जोडण्यातआली. शोकप्रसगात रडायच सोडून गाणे म्हणणे ही रगभूमीवरील अवास्तव घटनाच म्हणायला हवी. कारण गाण्याची ही सकल्पना व रंगभूमीची सकल्पना यामध्ये मूलत फरक आहे. पण हा सकर सगीत नाटक रगभूमीने घडवून आणला आणि तो महाराष्ट्राला अभिमान वाटावा असा अमोल ठेवा झाला.

सगीत नाटकामधील नाट्यमूल्य आणि संगीतमूल्य यामध्ये सगीताचा भाग अधिक आणि महत्त्वाचा. सगीताची परपरा वेदकाळापासून अमल्यान रसिकाना स्वराच्या माधुर्याची आवड अधिक असणे साहजिक आहे. पण हे सगीत 'प्रेक्षणीय' केले ते या रंगभूमीने कारण ही प्रेक्षणीयता काहीशी विकृत स्वरूपाची होती. स्त्रीवेषातील पुरुषाला स्त्री म्हणून स्वीकारणे हे फॅन्टसीचं मूळ या वेळच्या प्रेक्षकामध्ये होते. बालगधर्व जसा शालू नेसत तसा तो नेसणे, त्याच्या लकबी उचलणे इथपर्यंत त्याचा समाजावर परिणाम झाल्याच्या मिथस् निर्माण झाल्या. हा परिणाम भारावलेपणापेक्षाही अधिक गभीरच होता.

'नाटक सवाई माधवराव यांजवर.' या गद्य नाटकातील रमाबाईच्या सतीच्या प्रसंगात पुण्यातील त्या वेळच्या स्त्रिया राग लावून त्या पुरुष रमाबाईची खणानारळाने ओटी भरीत असत आणि ओटी भरण्याचा कार्यक्रम चार–चार तास चालत असे. म्हणजे मूळ नाटक राहिले बाजूला पण यासारख्या कलाबाह्य आणि विकृत गोष्टीकडेच जास्त ओढा !

## संगीताचाच वरचष्मा

संगीत नाटकातील सगीत गाणारे नटही कसे होते ? नाटकात वन्समोअर मिळविला की त्याना समाधान व्हायचे. हे 'वन्समोअर' देणारे प्रेक्षक, वन्समोअर देताना बालगधर्व, मा. दीनानाथ, मा. कृष्णराव याना गायक म्हणूनच महत्त्व देत; पण तरीही दुसऱ्या बाजूला त्या नटाना स्त्री म्हणून स्वीकारीत, ही त्या प्रेक्षकामधील पाहण्यासारखी गमत आहे. आजूबाजूच्या सामाजिक परिस्थितीत इतके शैथिल्य आलेले होते की लोकाना कशात तरी मन रिझवणे या प्रक्रियेकडे वळणे भाग पडले आणि त्यामुळेच या सगीत नाटकाचा टिकाव झाला.

या टिकावाला दुसरे एक आणि तितकेच महत्त्वाचे कारण म्हणजे त्यातील गायक (नट) हे 'गायक नट', नट असण्यापेक्षा गायकच जास्त होते, कारण त्याच्या गायनावद्द जेवढे लिहिले गेले आहे व बोलले जाते त्यामध्ये त्याच्या अभिनयाचा सदर्भ जवळजवळ नसतोच. त्या काळी सगीत नाटकात भूमिका हवी असेल तर तो गायक असण महत्त्वाचे, बाकी 'अभिनय' वगैरेचे नंतर बघता येईल अशीच भाषा. म्हणजे रगभूमीवर अभिनयापेक्षा चागले गाता येणे याला महत्त्व जास्त. हे गायक बहुताशी बैठकी गाजवणारे गायक नव्हते पण शास्त्रीय सगीताची बैठक मात्र त्याना असे. आणि नाट्यसंगीताला हे अनुकूल ठरले कारण नाट्यसगीतात बैठकीतल्यासारखा ख्याल गायचा नसतो किंवा नुसते शब्द स्वरात बुडवून काढायचे नसतात तर हे दोन्ही असणारे पण या दोन्हीच्या सापटीतले असे हे नाट्यसगीत ! बालगधर्व, मा. दीनानाथ याच्याजवळ अभिनयगुण कितपत होते याबद्दल फारसा बोलबाला झालेला नाही. त्याचे गाणे मात्र निःसशय वेगळे आणि खास होते हे त्याच्या आजही असलेल्या कलाप्रियतेवरून कळून येते; बालगधर्व हे सगीतप्रेमीचेच दैवत ठरले रगभूमी प्रेमिकाचे नव्हे.

सगीत नाटकात गाणे किती असावे, त्याच्या मर्यादा काय याबाबत कै. गोविंदराव टेंबे यानी १९४१ सालच्या 'समीक्षक' नाट्यसमेलन विशेषाकात म्हटले आहे ते विचारात घेण्यासारखे आहे.

' नव्या चालीचे नवे नाटक प्रथम जेव्हा रंगभूमीवर येते त्या वेळी कोणताही नट मग तो केवढाही गायक असो, आपली पद्ये प्रथमत जपूनच गातो. कारण चाली नव्या असल्यामुळे त्याला तितका आत्मविश्वास वाटत नाही आणि कोणत्या पदाना लोकाची मान्यता मिळेल याचा अदाज त्याला लागलेला नसतो. चार–दोन प्रयागांत्याला प्रेक्षकाची नाडी समजू लागते आणि मग काही निवडक पद्ये तो रगवू लागतो–किंवा घाळवू लागतो. प्रेक्षकाच्या आवडाचा असा नटाकडून गौरव होऊ लागला म्हणजे नटाचा उलट गौरव करणे हे प्रेक्षकाचे कर्तव्य ठरते आणि त्यामुळे १५–२० मिनिटे कसाशीने पद गायल्यावर सुद्धा 'वन्स मोअर' ची टाळी देऊन ते पुनःपुन्हा गाऊन घेतले नाही तर आपल्या दर्दीपणाला व रसिकतेला बट्टा लागेल असे प्रेक्षकाना वाटते. शेवटी सगीत नाटकाच्या यशाचे मुख्य गमक काय तर कोणत्या पात्राना व पदाना किती वन्समोअर मिळाले हे !

'वास्तविक प्रेक्षकानीच ही बाब हाती घ्यायला पाहिजे होती; परतु आमच्या प्रेक्षक वर्गाला सवयच होऊन गेली आहे की, एका नाटकाचे पैसे खर्चून दोन तीन नाटकाचे सगीत ऐकावयाचे !'

ही पद्धत पुढेपुढे बंद पडली. कारण सामाजिक परिस्थितीतही महत्त्वाचे बदल

घडून आले. स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या औद्योगिकरणाचे पडसाद संगीत रंगभूमीवरही एका अर्थाने आलेच संगीत नाटकांमुळे शास्त्रीय संगीताचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला त्यामुळे बड्या गायकाचे जलसे सामान्यासाठी होऊ लागले. रागाची ओळख नाट्यपदाच्या चालीवरून करण्याइतपत स्वरज्ञान प्रेक्षकाना झाले. त्याचबरोबर शास्त्रीय उपकरणाचा प्रसार झाला. एकाच वेळी हजारो प्रेक्षकाना ऐकू जाऊ शकेल अशी स्पीकर्स-सिस्टिम आली

ही नाटके ' इंटिमेट थिएटर ' मधून ' प्रोसिनियम ' मध्ये जाण्याला ही शास्त्रीय शोधाची घटनाच कारणीभूत झाली. त्याचप्रमाणे रेडिओ - ध्वनिमुद्रण, ध्वनिफीत यासारखी नवनवी उपकरणे आली आणि समाज जीवनात मोठेच घडून बदल आले आता संगीत ऐकण्याची तृष्णा फार मोठी राहिली नाही. ती सहजरीत्या भागली जाऊ लागली. त्यामुळे नवनवी संगीत नाटके अस्तित्वात येण्याला खीळ बसली जुनीच नाटके नवनव्या संस्था पुन्हा पुन्हा करू लागली. या नाटकाना अधिक कॉम्पॅक्टनेस प्राप्त झाला. आताही हा संगीतप्रकार कालबाह्य होऊ लागल्याचे जाणवते. या नाटकांची अवीट गोडी त्याच्या संगीतातच आहे हे नि संशय. त्यातील नाट्यमूल्य हा दुय्यम भागच राहला आणि आता जुन्याचा सोस साभाळणे यापलीकडे या नाटकांना अर्थ उरला नाही असे वाटते. शाकुतल ते कट्यार काळजात घुसली हा सगीत नाटकाचा प्रवास या सर्व सामाजिक बदलाबरोबरच झाला असे दिसून येते.

वास्तवता हा सगीत नाटकाचा पायाच नव्हे. कोणत्याच संगीत नाटकानी हे अग जोपासले नाही. कारण किर्लोस्कर, देवल, खाडिलकर आदि नाटककाराच्या रचनामध्ये पुन्हा पुन्हा सगीताधिष्ठित कथानकाचीच प्रेरणा झाली. गडकऱ्यानी हे नाटक सामाजिक प्रश्नाकडे आणले यालाही त्या वेळची परिस्थितीच कारणीभूत होती; पण तरीही शुद्ध कलामूल्याच्या निकषावर हा सगीत व नाटक याचा सकर कितपत टिकू शकतो ? संगीताला अनुकूल प्रसग निर्माण करायचे आणि गायकाने म्हणजे नटाने त्या प्रसंगाचे भान विसरून, रगभूमीचे भान विसरून पदातील कोणत्याही एका शब्दावर स्वराची लोळण घेत बसायचे हे आजच्या प्रेक्षकाला पटाणारे नाही, पण तो सगीत म्हणूनच ते स्वीकारीत असतो

संगीत रगभूमीची ही शताब्दी योग्य त्या इतमामानेच पार पाडली. शासकीय मानमरातबही मिळाले, पण आता हे सारं जपून ठेवणे एवढेच शक्य आहे. कारण या नाट्यप्रकाराची सामाजिक गरज संपलेली आहे या शताब्दी वर्षात संगीत रंगभूमीच्या पुनरुज्जीवनासाठी अनेक योजना आखल्या गेल्या; पण त्या प्रत्यक्षात येण्यासाठी हवी असणारी परिस्थिती आज नाही. म्हणूनच आता प्रेक्षकानाही या दृष्टिकोनातून पहायला हवे.

## असा सोहळा पुन्हा न होणे

भरत नाट्य मंदिराच्या वतीने दि ३१ आक्टोबर ते ४ नोव्हेंबर असे पाच दिवस पाच सगीत नाटके -सादर करण्यात आली. रेणुका स्वरूप मेमो. हायस्कूलच्या पटागणात भव्य ' किर्लोस्कर नाट्यगृहा'ची स्थापना झाल्याने या महोत्सवाला एक भव्यताच प्राप्त झाली. नाटकाचे प्रयोगही या भव्यतेला साजेसेच झाले.

स्वरराज छोटा गंधर्वांची भूमिका असलेल्या सौभद्र नाटकाने महोत्सवाचा मखमली पडदा वर गेला. स्वरराजाचा आवाज अजूनही तसाच गोड, किरतही तशीच याचा पुन.प्रत्यय आला. त्यानी श्रीकृष्णाची भूमिका केली. सौभद्रेची भूमिका गंधर्वांची शिष्या सुचेता ठोबरे हिने केली; रामदास कामत याचे गायनही चागले झाले, पण तरीही छोटा गंधर्वांच्या गायनामुळे या संगीतप्रयोगाला विशेष रग भरला.

मानापमानमध्ये लक्ष्मीधराची भूमिका दाजी भाटवडेकरानी सुरेखच केली. राम मराठेंचा धैर्यधर फार वेळ गात राहिल्यामुळे काहीसा कटाळवाणा मात्र झाला भामिनीच्या भूमिकेत 'रजनी जोशी यानी ' नाही मी बोलत ' यासारखी पदे विशेष रंगवून प्रयोगात रंगत आणली.

सशयकल्लोळचा प्रयोग सर्वच, दृष्टीनी सरस झाला. डॉ. वसतराव देशपांडे-फैय्याज या जोडीमुळे नाटकातील सगीतात जान आली. मूळ सहितेमध्ये नाट्यगुण असल्यामुळे गद्यभूमिका करणाऱ्या चित्तरजन कोल्हटकर इ ंच्या भूमिकाही लक्षात राहण्यासारख्या झाल्या डॉ. वसंतरावानी नाट्यसंगीताचे नाटकातील स्थान बरोबर ओळख्यामुळे फारसा विस्तार न करता पण सहजसुंदर अशा त्याच्या गायनाने श्रोतृवर्ग मुग्ध झाला.

शाकुतल नाटक 'भरत'च्याच हौशी कलावतानी सादर केले. हौशी असाच हा प्रयोग झाला. क्षमा वैद्य, उदयन काळे यासारख्या नवोदित गायकानी भूमिका करून हे नाटक सादर केले.

शेवटच्या दिवशीचा मृच्छकटिकचा प्रयोग छोटा गंधर्वांच्या गोड गळ्यामुळे केवळ अविस्मरणीय असा झाला. त्याच्या जोडीला मधुवती दाडेकर याच्यासारखी गायिका व दाजी भाटवडेकरासारखे नट असल्याने हा प्रयोग लक्षात राहण्यासारखा झाला गंधर्वांची सर्वच पदे, अगदी साकी दिंड्याही रसिकाची मनापासूनची दाद घेऊन गेली. दाडेकरानीही आपल्या गायनाने प्रेक्षकाच्या आनदात भरच टाकली.


' असा सोहळा पुन्हा न होणे ' असेच या महोत्सवाचे वर्णन करायला हवे. पाचही दिवस प्रेक्षकाची भरपूर गर्दी होती. सर्व कसलेले, जुने-जाणते कलाकार एका रंगभूमीवर एकत्र भूमिका करतानाचे ते दृश्य दुर्मिळच होते. ह्या सोहळ्याने सर्वच अर्थाने प्रेक्षकाची सगीत नाटकाची ' तृष्णा ' भागविली असे म्हणणे योग्य ठरेल.

अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या वतीने या महोत्सवानिमित्त ' शतरग ' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. सगीत नाटकाच्या सगीतातील बदल कसकसे होत गेले याचे सुदर दर्शन या कार्यक्रमात झाले. छोटा गंधर्व, रामदास कामत, रजनी जोशी, मधुवंती दाडेकर, भार्गवराम आचरेकर, ज्योत्स्ना भोळे इत्यादी ज्येष्ठ गायक-गायिकानी ह्या कार्यक्रमाला यश मिळवून दिले. सौ. सुहासिनी मुळगावकर यानी लिहिलेला व दिग्दर्शित केलेला हा कार्यक्रम लक्षणीय होता.



"कटीण आणि खरखरीत टूथ पावडरी तुमच्या हिरड्या नि दातांना इजा करू शकतात..."

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे संरक्षण करा — श्वास दुर्गंधीही थांबवा!**






कोलगेट टूथ पावडर अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हळुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटींत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.**

TP.G.30 MB

## पुणे वार्ता.... पृष्ठ ४ वरून

या कार्यकर्त्यांना ज्या प्रसंगांना नित्य सामोरे जावे लागते ते प्रसंग आज मोठ्या प्रमाणावर अन्याय, शोषण आणि जातीयता यांमधून निर्माण झालेले आहेत. म्हणून शोषण आणि जातीयतेच्या प्रश्नावरही विचारमंथन स्वाभाविक होते जनता युवा मोर्चाचे धुळे भागात काम करणारे कार्यकर्ते श्री. धरमचंद चोरडिया यांनी समतेचा विषय पुढे ठेवून हे काम केले. घटनेचा; कायद्याचा, त्याच्या अंमलबजावणीचा, सुधारकांचा आणि सामान्य माणसाच्या जातीयतेकडे पहाण्याच्या दृष्टिकोणाचा विचार त्यांनी मांडला आणि युवक कार्यकर्त्यांनी यासाठी ठोस पावले उचलावीत, म्हणून काही मागण्या आणि कार्यक्रमही दिले.

या अभ्यासशिबिराच्या समारोपाला खासदार श्री. कलराज मिश्र आणि भा. ज. प. चे महामंत्री श्री. सिकंदर बख्त उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्त्यांची दृष्टी लक्षवेधी असली पाहिजे आणि वैचारिक गोंधळापासून दूर असली पाहिजे म्हणून शंकासमाधान, विचारविनिमय, आत्मविश्वासात वाढ आणि सामर्थ्याचा अंदाज यासाठी अशा प्रकारच्या अभ्यासशिबिराची आवश्यकता श्री कलराज मिश्रांनी प्रतिपादन केली.

राजनैतिक घटनांवरचा आणि राजकारणी माणसांवरचा विश्वास उडाला आहे, अपराधांना जन्म देणारी निराशा वाढते आहे, संभ्रमित अवस्थेत आदर्श आणि व्यवहार यांचा मेळ घालता येत नाही अशा परिस्थितीत चारित्र्य सुधारून, आमच्या शब्दांवर लोक विश्वास ठेवतील असा प्रयत्न आम्ही केला पाहिजे. उद्देश, लक्ष आणि कार्यक्रमांची स्पष्टता, हे शिबिराचे उद्दिष्ट आहे.

या उद्दिष्टाची चर्चा करताना सिकंदर बख्त यांनी राष्ट्रीयतेच्या अभावाबद्दल सखेद संताप व्यक्त केला. कदाचित् राष्ट्रवादाचा अभाव असलेला हाच एक देश असेल. जर्मनी आणि जपान यांसारखे आम्ही उभे राहू शकत नाही, याचे एक कारण राष्ट्रीयतेचा अभाव हेच आहे. प्रदेशांची ताकद शस्त्रांत नाही, ती माणसांच्या एकतेत आहे. पण घोषणांच्या आजच्या आमच्या जगात फक्त विघटनच सुरू आहे. दुहेरी निष्टांचा प्रश्न गैरलागू असल्याचे सांगून हिंदु–मुस्लिमांच्या प्रश्नाबाबतही सामंजस्य आणि राष्ट्रवाद यांचाच उच्चार त्यांनी केला.

शिबिर संपल्यानंतर जे प्रश्न उरतात ते खरे महत्त्वाचे. भाषणे ऐकताना नेहमीच थरारल्यासारखे होते; जल्लोष करावासा वाटतो. स्वप्नांच्या जगात क्षणभर आपण हरवतो. पण नंतर? 'जो अपना स्वाभाविक खो बैठा है वह किसी क्षेत्रमें कोई योगदान नहीं दे सकता !' हे श्री. वाजपेयींचे म्हणणे खरे असले, तरी 'जो अपनीही स्वाभाविकताका सच्चा और परम अर्थ नहीं जान सकता, वो भी किसी क्षेत्रमें अपना योगदान नहीं दे सकता !' हेही तेवढेच खरे आहे. या शिबिरातून किती कार्यकर्ते वैचारिक सुसंगतीकडे वळणार आहेत? कितीजण निश्चित कार्यक्रम अंगीकारणार आहेत ? कितीजण खुल्या विचारांच्या प्रांगणात उतरणार आहेत ? ग्रामपंचायतींपासून संसदेपर्यंत असा एक पद्धतशीर काम करणारा विवेकनिष्ठांचा संच, की जो कोणत्याही वादळात आपल्या मूल्यांवर घट्ट उभा राहील, असा निर्माण करण्यासाठी ते डोळसपणे कटिबद्ध होणार आहेत का ? आपल्या संपूर्ण परंपरेला युगानुकूल बनवण्याच्या त्यांच्या नेत्यांच्या विचारांना ते कृतीत उतरवणार आहेत का ?

या प्रश्नांची उत्तरे उद्याच्या जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या निःसंदिग्ध कृतींमधून द्यायची आहेत. □